


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर,बुधवार दि. ०६.०८.२०२५ | अंक नं. १०९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







# सावेडी उपनगरात पुन्हा चेन स्नॅचिंग

## गुलमोहोर रोडवर पहाटे घडलेली घटना

नगर - सकाळी देवदर्शनासाठी पायी गेलेल्या वृद्ध महिलेला धक्का देऊन, तिच्या गळ्यातील २ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, चोरट्याने हिसकावून चोरुन नेल्याची घटना ६ ऑगस्ट रोजी पहाटे ५.४५ वाजण्याच्या सुमारास सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील नवलेनगर येथील मारुती मंदिर परिसरात घडली.

याबाबत सिताबाई दिनेशकुमार मंडल (वय ६०, रा.कविजंगनगर, गुलमोहर रोड, अ.नगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या दररोज सकाळी फिरण्यासाठी बाहेर जातात. ६ ऑगस्ट रोजी सकाळी साडेपाच वाजता फिर्यादी या मॉर्निंग वॉक करुन देवदर्शन करण्याकरिता नवलेनगर येथील मारुती मंदिरात गेल्या होत्या. देवदर्शनानंतर त्या ५.४५ वाजता मंदिराबाहेर येऊन काही अंतर चालत असताना, त्यांच्यामागून आलेल्या एका इसमाने त्यांच्या गळ्यातील सुमारे २ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र ओढून तोडले. यावेळी फिर्यादी यांनी प्रतिकार केला असता, चोरट्याने त्यांना जोरात धक्का दिला. आणि घटनास्थळावरुन पळून गेला. फिर्यादी यांनी आरडाओरडा करीत त्याचा पाठलाग केला असता, त्याने काही अंतरावरच लावलेल्या मोटारसायकलवर बसून तो जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने पसार झाला.

त्या चोरट्याने काळ्या रंगाची टोपी, फिकट निळा शर्ट आणि काळी पॅन्ट परिधान केली होती. अशी माहिती फिर्यादी यांनी पोलिसांना दिली. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी सीताबाई मंडल यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (४) प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास तोफखाना पोलीस करीत आहेत.

### वारंवार चेन स्नॅचिंग पण पोलिसांना लागेना तपास

शहरात विशेषत: सावेडी उपनगरात वारंवार चेन स्नॅचिंगच्या घटना घडत आहेत. चोरटे पहाटेच्या वेळी मॉर्निंग वॉक किंवा सकाळी आणि सायंकाळी देवदर्शनासाठी रस्त्याने पायी चाललेल्या महिलांना लक्ष्य करत आहेत. तोफखाना पोलिस ठाण्यात याबाबत अनेक गुन्हे दाखल झाले आहेत. मात्र या गुन्ह्यांचा तपास काही लागलेला नाही. त्यामुळे सातत्याने या चेन स्नॅचिंगच्या घटना घडत आहेत. अशा प्रकारे चोऱ्या करणाऱ्या चोरट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांनी एखादे विशेष पथक नियुक्त करून अशा चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



नगर शहरात रिक्षा चालकांकडून सर्रासपणे वाहतुकीचे नियम धाब्यावर बसविल्याचे पहावयास मिळत आहे. विशेष म्हणजे शहर वाहतूक शाखेच्या कार्यालयाच्या समोरुन दररोज शालेय विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात घालून पॅगो रिक्षा चालकांकडून नियमबाह्य प्रवासी वाहतूक केली जात आहे. पत्रकार चौकात टिपलेले हे दृश्य.( छाया - धनेश कटारिया)



नगर - पुणे महामार्गावर सीना नदी पुलावर स्कूल व्हॅनला झालेल्या अपघातामुळे व्हॅनची झालेली दुर्दशा.

# सीना नदी पुलावर स्कूल व्हॅन पलटी होऊन भीषण अपघात

## चालक गंभीर जखमी, विद्यार्थी नसल्याने सुदैवाने मोठा अनर्थ टळला

नगर - शाळेतील विद्यार्थ्यांना ने आण करणाऱ्या स्कूल व्हॅनला नगर पुणे महामार्गावर सीना नदीच्या पुलावर ६ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० च्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात व्हॅन पलटी होऊन चालक गंभीर जखमी झाला. तसेच वाहनाचे मोठे नुकसान झाले. यावेळी व्हॅन मध्ये शालेय विद्यार्थी नसल्याने सुदैवाने मोठी हानी टळली आहे.

सारसनगर येथील सुनील पांडे हा त्याची स्कूल व्हॅन (क्र. एम एच १६ बी सी ९९२) घेऊन केडगाव येथे शालेय विद्यार्थी आणण्यासाठी जात असताना सीना नदीत पूलावर आल्यानंतर अचानक व्हॅन वरील नियंत्रण सुटल्याने व्हॅन पूलाच्या कठड्याला धडकून पलटी झाली. या अपघातामध्ये व्हॅन चालक सुनील पांडे याच्या पायाला व हाताला गंभीर मार लागल्याने तो जखमी झाला. अपघात होताच घटनास्थळी जमलेल्या नागरिकांनी पलटी झालेली व्हॅन सरळ करुन चालक पांडे यास तेथून जवळच असलेल्या पॅसिफिक हॉस्पिटल येथे उपचाराकरीता नेले. परंतु तेथील डॉक्टरांशी चर्चा करुन पांडे यास श्रीदीप हॉस्पिटल येथे उपचाराकरिता दाखल केले. तेथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

# पोलिसांच्या ताब्यातील तरुणाच्या मृत्यू प्रकरणी चौघांविरुद्ध 'सदोष मनुष्यवधाचा गुन्हा' दाखल

## 'सीआयडी'च्या पोलिस उपअधिक्षकांनी दिली फिर्याद

नगर - चोरीच्या संशयावरुन नागरिकांनी मारहाण करत सुपा पोलिसांच्या ताब्यात दिलेल्या तरुणाचा मृत्यू झाल्याप्रकरणी ४ जणांच्या विरुद्ध सुपा (ता.पारनेर) पोलिस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २३ जुलै रोजी पहाटे झाली होती. याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सी.आय.डी.) देण्यात आलेला असून पोलिस उपअधिक्षक शिवाजी आण्णासाहेब डोईफोडे यांनी ५ ऑगस्ट रोजी याबाबत फिर्याद दिली आहे.

हितेशकुमार रविश्वर प्रसाद (वय २६, हल्ली रा. पनवेल, मूळरा.कुशीनगर जिल्हा, उत्तरप्रदेश) असे मयत तरुणाचे नाव असून त्याला बेदम मारहाण केल्या प्रकरणी शरद आबा पवार, अमोल संपत पवार, अक्षय दिपक सुपेकर, अमित दिपक सुपेकर (सर्व रा. सुपा, ता.पारनेर) यांच्या विरुद्ध बीएनएस २०२३ चे कलम १०५, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत तरूण हितेशकुमार प्रसाद हा महाराष्ट्रात कामानिमित्त राहत होता. २३ जुलैच्या पहाटे त्याच्यासह काही साथीदारांनी सुप्याजवळील पवारवाडी येथील यशवंत इंजिनिअरिंग सिमेंट पाईप फॅक्टरीत वीजपुरवठा बंद करून तेथील माल चोरण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी हितेशकुमार प्रसाद हा तिथे एक पिकअप व्हॅन (एम एच २० ईजी २३३५) घेऊन थांबलेला होता. फॅक्टरीत वीज गेल्याने चोरीचा संशय आल्याने स्थानिक तरुणांनी घटनास्थळी धाव घेतली. तिथे तरूण येताच हितेशकुमार पिकअप घेउन पळून गेला, मात्र स्थानिक तरूणांनी त्याचा पाठलाग केला आणि त्याला सुपा टोल नाक्यावर गाठले आणि बेदम मारहाण केली.

हा प्रकार पोलिसांना समजल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी हितेशकुमार यास ताब्यात घेउन पोलीस वाहनातून त्याला पोलीस ठाण्यात नेण्यात आले.२३ जुलै रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास हितेशकुमारची प्रकृती खालावली. त्यास उपचारासाठी खाजगी रूग्णालयात नेण्यात आले. मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यास मृत घोषित करण्यात आले. विशेष म्हणजे कोणताही संशयित ताब्यात घेतल्यानंतर वैद्यकीय तपासणी बंधनकारक असते. मात्र तपासणी न करता तासनतास पोलिस ठाण्यातच बसवून ठेवण्यात आल्याने त्याच्या मृत्यूभोवती संशयाचे धुके निर्माण झाले होते.

हितेशकुमारच्या मृत्यूचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याचा मृतदेह छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रूग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. मृताच्या डोक्यात जड वस्तूने जबरदस्त प्रहार झाल्याने मेंदूमध्ये रक्तस्त्राव झाला आणि त्यामुळेच त्याचा मृत्यू झाला असल्याचे शवविच्छेदन अहवालातून समोर आले होते. तसेच या गुन्ह्याचा तपास सीआयडी कडे सोपविण्यात आला होता. सीआयडी ने टोलनाक्यावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत आरोपी निष्पन्न केले असून या ४ जणांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, अहिल्यानगरचे पोलिस उपअधिक्षक सुहास घोडके हे करीत आहेत.















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com



महात्मा फुले चौक या नामफलकाची विटंबना करणाऱ्या समाज कंटकांवर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन ओबीसी व्हिजेएनटी संघटनेच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना देण्यात आले.

# ‘महात्मा फुले चौक नामफलका’ची विटंबना करणाऱ्या समाज कंटकांवर कारवाई करावी : ‘ओबीसी व्हिजेएनटी’

### जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – ’महात्मा ज्योतिबा फुले चौक’ असा नामफलक लावण्यात आला होता. मात्र रविवारी रात्री काही समाजकंटकांनी नामफलकाची विटंबना करीत मोडतोड केली.

कर्जत राशीन येथील करमाळा रोड येथे महात्मा ज्योतिबा फुले चौक या नामफलकाची विटंबना करणाऱ्या समाज कंटकांवर कारवाई करावी. या मागणीचे निवेदन अहिल्यानगर ओबीसी व्हिजेएनटी संघटनेच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांना देण्यात आले.

याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले, अभय आगरकर, अनिल बोरुडे, बाळासाहेब बोराटे, धनंजय जाधव, शेंडीचे सरपंच प्रयागाताई लोंढे, बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष माऊली गायकवाड, माळी महासंघाचे अध्यक्ष भूषण भुजबळ, समता परिषदेचे रामदास फुले, बाबासाहेब सानप, काका शेळके, किरण बोरुडे, बाळासाहेब गायकवाड, ज्ञानेश्वर रासकर, पंडितराव खरपुडे, प्रकाश इवळे, निशांत दातीर, अर्जुन बोरुडे, नितीन भुतारे, परेश लोखंडे, विशाल वायकर, संजय सागांवकर, साहेबराव विधाते, सुरेश आंबेकर, डॉ.रणजीत सत्रे, अनिल इवळे, विनोद पुंड, सुधीर पुंड, बाबासाहेब दळवी, जालिंदर बोरुडे, सुनील जाधव, रमेश चिपाडे, ब्रिजेश ताठे, मच्छिंद्र बनकर, अनंत गारदे, गणेश कानगावकर, सौ.रोहिणी बनकर, नितीन डागवाले, सुधीर पुंड, भानुदास बनकर, मनोज भुजबळ, अशोक ताठे, विवेक फुलसौंदर, नंदकुमार नेमाने, संदीप दळवी, राजेंद्र बोरुडे, मनोज फुलसौंदर, रोहिदास हराळे, राहुल साबळे, योगेश फुलारी, तुषार फुलारी, योगेश धाडगे, शिवाजी धाडगे, शरद मुर्तडकर, देविदास खामकर, रेणुका पुंड, रोहिणी बनकर, कल्याणी गाडळकर, आश्विनी दळवी आदी उपस्थित होते.

निवेदनात पुढे म्हटले की, थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांनी सर्व समाजासाठी शिक्षणाची द्वारे खुली केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची समाधीचा शोध लावून शिवजयंती मोठ्या पद्धतीने साजरी केली आहे. तसेच स्त्री शिक्षणाचा पुढाकार घेऊन महिलांना शिक्षण देण्याचे महान कार्य केले आहे. या थोर महापुरुषांच्या नावाने महात्मा ज्योतिबा फुले चौक असे नामकरण करण्यात आले होते.

या घटनेमुळे अहिल्यानगर येथील ओबीसी समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. सर्व ओबीसी समाज संतप्त झाला आहे. या घटनेतील समाजकंटकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ओबीसी व्हिजेएनटी जनमोर्चाच्यावतीने करण्यात येत आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
‘मुसाफिर’–९८२२०२०६९१

### भारतीय स्त्री – सौंदर्यवान – बुद्धीमान...



आपली सनातन परंपरा अत्यंत प्राचीन आहे आणि भारतीय महिलांची महिमा तेव्हापासूनच दृष्टीगोचर आहे. सीता, द्रोपदी पासुन आजच्या आधुनिक महिला केवळ कुटुंबवत्सलच आहे असे नाही तर त्या कर्तृत्ववान, सौंदर्यवान अन् बुद्धीमानही आहेत.

याचा पुन्हा अभिमानाने उल्लेख करण्याचे कारण म्हणजे नुकत्याच झालेल्या महिला बुद्धीबळ विश्वविजेता स्पर्धा. या जागतिक बुद्धीबळ स्पर्धेत अंतीम फेरीत दोन्ही महिला आपल्या भारतीयच होत्या हे सुद्धा आनंददायीच ! पूर्व विजेती व अनुभवी कोनेरू हंपी (याशिवाय हरिका द्रोणावली, आर. वैशाली) हिला पराभूत करीत अवघ्या १९ वर्षाची दिव्या ८८ वी ग्रँडमास्टर झाली. तिच्या या नेत्रदिपक विजयात इच्छाशक्ती व कणखरता प्रभावाने दिसली.

फिडे महिला विश्वचषक जिंकताच तिच्या भावना अनावर झाल्या आणि सर्वप्रथम तिने आपल्या आईलाच साश्रूनयनाने भावनिक मिठी मारली. हे दृश्य प्रचंड व्हायरल झाले व व्हायलाच पाहिजे. प्रत्येक महिला, सर्व खेळाडू व भारतीयांना प्रेरणा व उच्च आनंद देणारा हा क्षण राहिल.

गंमत पहा २००२ साली (उपविजेती) कोनेरू हंपी जेव्हा ग्रँडमास्टर बनली होती तेव्हा आजची विश्वविजेती दिव्या देशमुख बालक होती हा एक विलक्षण बुद्धीबळासाठी आहे.

शैक्षणिक व बौद्धिक अनुवांशिकता लाभलेल्या दिव्याने प्रथम बँडमिंटन खेळावे असे तिच्या घरच्यांना वाटायचे पण कदाचित कमी उंचीमुळे वयाच्या ५ व्या वर्षांपासून ती बुद्धीबळ खेळायला लागली.

या स्पर्धेत एकही जीएम नॉर्म नसताना थेट विजेतेपद अन् गँडमास्टर किताब पटकावून तिने विक्रमच केलाय. त्यातच पुरुष विभागात डी. मुकेशला मिळोले विश्वविजेतेपद दुधात केशर असा अती आनंददायी क्षण भारतीयांच्या जीवनात आलाय. म्हणूनच म्हणावस वाटतं की भारतीय स्त्री सबला आहे. सौंदर्यवान आणि बुद्धीमानही आहे – तिला सलाम!

# बँकांनी लाभार्थ्यांची कर्ज मंजुरीची प्रकरणे वेळेत मार्गी लावावीत

### महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांचे निर्देश; अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेतून राज्यातील १.५० लाख तर जिल्ह्यातील १८ हजार लाभार्थ्यांना लाभ

नगर –मराठा समाजातील नवउद्योजकांना चालना देण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे कर्ज प्रस्ताव बँकांनी सुलभ पद्धतीने व विहित कालावधीत मार्गी लावावेत, असे निर्देश महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी दिले.

महामंडळाच्या योजनांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात बैठक घेण्यात आली. त्यावेळी श्री. पाटील बोलत होते.

बैठकीस उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी आशिष नवले, महामंडळाच्या विभागीय समन्वयक पल्लवी मोरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शक केंद्राचे सहायक आयुक्त रविकुमार पंतम, जिल्हा समन्वयक अमोल बोथे, कौशल्य विकास अधिकारी शुभदा पाठक, अनिल मोहिते, दिलीप भालसिंग व विविध बँकांचे अधिकारी उपस्थित होते.



श्री. पाटील म्हणाले, की महामंडळाच्या योजनांद्वारे राज्यातील १ लाख ५० हजार लाभार्थ्यांना उद्योगासाठी १२,६०० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले असून, १,२२२ कोटी रुपयांचा व्याज परतावा देण्यात आला आहे. जिल्ह्यातील १८ हजार लाभार्थ्यांना राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांमार्फत १,३४० कोटींचे कर्ज व १२३ कोटी रुपयांचा व्याज परतावा मिळाला आहे.

महामंडळामार्फत प्रामुख्याने मराठा समाजासाठी, तसेच ज्या प्रवर्गासाठी स्वतंत्र महामंडळ अस्तित्वात नाही अशा घटकांसाठी स्वयंरोजगारासाठी कर्ज व्याज परतावा योजना राबवली जाते. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट प्रकल्प व्याज परतावा योजना या शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजना असून, समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत या योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी त्यांचा व्यापक प्रचार–प्रसार होणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

बँकांनी योजनेचे स्वरूप समजून घेऊन कर्जवाटपाचे उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण होईल, यासाठी प्रयत्न करावेत. पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात कोणताही विलंब होऊ नये. प्रस्तावात त्रुटी असल्यास त्यांचे तात्काळ निराकरण करावे व विनाकारण प्रलंबित प्रस्ताव थांबवू नयेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीदरम्यान श्री. पाटील यांनी बँक अधिकाऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच ज्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, त्यांच्या समस्या समजून घेत त्या सोडवण्याच्या दृष्टीने आवश्यक सूचना केल्या.

## नगर–जामखेड रोडवर अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील तरुणाचा मृत्यू तर एक जण जखमी

नगर – नगर तालुक्यातील आठवड येथील कमानी जवळील पुलावर भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने पुढे चाललेल्या दुचाकीला पाठीमागून जोरात धडक दिली. या धडकेत दुचाकी वरील तरुणाचा मृत्यू झाला. असून एकजण गंभीर जखमी झाला. ही घटना २ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत विजय हरिदास विटकर (वय ३०, रा. भवानीनगर, अशोकनगर, ता. इंदापूर, जि. पुणे) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे धनराज उर्फ भाऊराव बाबासाहेब लोंढे यांच्यासह मोटारसायकल (क्र. एम एच ४२ बी एच ९५८३) वरुन चाललेले असताना जामखेड रोडवरील नगर तालुक्यातील आठवड गावच्या कमानी जवळील पूलावर भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने मोटार सायकलला पाठीमागून जोरात धडक दिली. या धडकेत फिर्यादी व पाठीमागे बसलेले धनराज लोंढे हे दोघे लांब फेकले गेले. या धडकेत धनराज उर्फ भाऊराव लोंढे यांचा मृत्यू झाला तर, फिर्यादी हे गंभीर जखमी झाले.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात विजय विटकर यांनी ५ ऑगस्ट रोजी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध बी एन एस १०६ (१), १२८, १२५ (अ )(ब) मोटार वाहन कायदा कलम १३४ (अ) (ब), १८४ प्रमाणे अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ए बी आव्हाड करीत आहेत.

## चाकू घेवून पाठलाग करत तरुणीला दिली मारण्याची धमकी; तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – एमआयडीसी येथील एका कंपनीत काम करणाऱ्या २२ वर्षीय तरुणीवर पाळत ठेवत चाकू घेवून तिचा दुचाकीवर पाठलाग केला. याचा जाब विचारला असता तरुणीच्या आई वडिलांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार शहरातील चितळे रोडवरील भराड गल्लीत ६ ऑगस्ट रोजी सकाळी ८.४५ ते ९ वाजेच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत पिडीत तरुणीने दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी तरुणी ही सकाळी ८.४५ च्या सुमारास आपल्या मोपेडवर एमआयडीसी येथील कंपनीत कामाला जाण्यासाठी निघाली. त्यावेळी अभिषेक चंद्रकांत म्याना (रा. भराड गल्ली, चितळे रोड) याने तिचा मोटारसायकलवर पाठलाग सुरु केला. सकाळी ९ च्या सुमारास मनमाड रोडवरील पद्मावती टी पॉईंट जवळ त्याने तिला गाठले आणि थांब मला तुझ्याशी बोलायचे आहे असे म्हणत त्याने खिशातून चाकू काढला. ते पाहून ती तरुणी घाबरली व तिने वेगात मोपेड चालवून डी मार्ट कडे नेवून भिस्तबाग मार्गे ती पुन्हा घराकडे आली. त्यावेळीही तो तिचा पाठलाग करत होता. ती घरात जाताना पाहून तो बाजूला निघून गेला. हा सर्व घडलेला प्रकार तिने आपल्या आई वडिलांना सांगितला.

त्यानंतर आई वडिलांनी त्या तरुणाच्या आई व आत्याला हा प्रकार सांगून तुमचा मुलगा आमच्या मुलीवर पाळत ठेवून वारंवार पाठलाग का करतो अशी विचारणा केली. त्यावेळी त्या दोघींनी तरुणी व तिच्या आई वडिलांनाच शिवीगाळ सुरु करत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी अभिषेक म्याना हा पुन्हा तेथे आला व त्याच्या कडील चाकू दाखवत तुम्हांला मी सोडणार नाही अशी धमकी दिली. सदर आरोपी हा आपण कामावर किंवा बाहेर गेल्यावर वारंवार आपल्यावर पाळत ठेवून पाठलाग करत असल्याचे त्या तरुणीने फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी आरोपी अभिषेक म्याना, त्याची आई व आत्या या तिघांवर बीएनएस २०२३ चे कलम ७८ (१), ३५२, ३५१(२) (३) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## संसद भवनासमोर हिराबेन मोदी यांचा पुतळा उभारावा; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गळफास लावून केली मागणी



संसद भवनासमोर हिराबेन मोदी यांचा पुतळा उभारण्यात यावा, यासाठी साहेबराव काते यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गळफास लावून मागणी केली.

नगर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री स्व. हिराबेन मोदी यांचा पुतळा संसद भवनासमोर उभारण्यात यावा, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या अनुसूचित जाती मोर्चा शहर जिल्हा उपाध्यक्ष सहेबराव शंकरराव काते यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झाडाला गळफास लावून मागणी केली आहे.

या निवेदनात काते यांनी नमूद केले आहे की, नरेंद्र मोदी यांना घडवणाऱ्या व त्यांना जीवनमूल्यांची शिकवण देणाऱ्या हिराबेन मोदी यांचा आदर्श समस्त देशवासीयांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी नरेंद्र मोदींसारख्या कर्मठ, कर्तव्यनिष्ठ प्रामाणिक नेता घडवला, जे आज देशाचे सर्वोच्च नेतृत्व करत आहेत.

काते यांच्या म्हणण्यानुसार, हिराबेन ही ७० कोटी जनतेची आई आहे. त्यांचा पुतळा संसद भवनासमोर उभारल्यास देशातील प्रत्येक मातेचे प्रतिनिधित्व होईल. त्यांच्या स्मृतीला वंदन करण्यासाठी १० दिवसांचा स्मरणोत्सव आयोजित करून, सार्वजनिकरित्या पुतळा उभारावा अशी मागणी केली आहे.

या मागणीला जिल्हा व राज्य पातळीवरून पाठिंबा मिळावा, तसेच नवीन संसद भवनासमोर हिराबेन मोदी यांच्या पुतळ्यासाठी जागा निश्चित करण्यात यावी, अशी मागणी सहेबराव काते यांनी या निवेदनातून व्यक्त केली आहे.

## कांतीलाल मेहेर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – कडा येथील रहिवासी कांतीलाल पन्नालाल मेहेर (वय ८६) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कडा अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ४ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कडा येथील मार्केटयार्ड आडत व्यापारी संजय मेहेर यांचे ते वडील होत.

## लताबाई पाठक यांचे अल्प आजाराने निधन



नगर – यशोदानगर पाईपलाईन रोड येथील रहिवासी श्रीमती लताबाई श्रीकांत पाठक (वय ६१) यांचे ६ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, दीर, जावा असा परिवार आहे.

## सुनंदाताई दिकोंडा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – श्रमीकनगर येथील रहिवासी सौ.सुनंदाताई किशोर दिकोंडा (वय ६०) यांचे ३१ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, ४ भाऊ, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दत्तात्रय, विजय, प्रकाश, किशोर दिकोंडा यांच्या त्या वहिनी तर मनोज व मयूर दिकोंडा यांच्या मातोश्री होत.

# आडते बाजारपेठेतील वाहनांवरील दंडात्मक कारवाई थांबवून मंगलगेट पोलीस चौकी त्वरित सुरु करावी

### व्यापारी असोसिएशनची जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – शहरातील आडते बाजार, दाळमंडई, तेलीखुंट, जुना दाने डबरा, वंजार गल्ली, तपकीर गल्ली, गंजबाजार या भागात माल देण्यासाठी व घेण्यासाठी आलेल्या टेम्पो व इतर वाहनांवर पोलिसांकडून वारंवार ऑनलाईन दंडात्मक कारवाई केली जात आहे. त्यामुळे वाहनचालकांचे अतोनात नुकसान होत असून ते बाजारपेठेत येण्यास नकार देऊ लागले आहेत. त्यामुळे पोलीसांना ऑनलाईन दंड करण्याची कारवाई त्वरीत थांबवण्यासाठी योग्य तो आदेश द्यावेत. बाजारपेठेतील वाहनांना थेट दंड न आकारता पोलीसांनी वाहतूक सुरळीत कशी करता येईल याकडे लक्ष देवुन वाहन चालकाला व व्यापा–यांना सहकार्य करावे. तसेच मंगलगेट पोलीस चौकी त्वरित सुरु करून चोऱ्यांना आळा घालावा, या निवेदन आडते बाजार व्यापारी असोसिएशनच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना देण्यात आले.



शहरातील बाजारपेठेतील प्रश्नांबाबत पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना आडते बाजार व्यापारी असोसिएशनच्या वतीने देताना अध्यक्ष गोपाल मणियार, सचिव संतोष बोरा, राजेंद्र बोथरा, राजेश गुगळे, सचिव विश्वनाथ कासट व पदाधिकारी. (छाया – लहू दळवी)

यावेळी आ.संग्राम जगताप, असोसिएशनचे संस्थेचे उपाध्यक्ष गोपाल मणियार, सचिव संतोष बोरा, मार्केट कमेटी संचालक राजेंद्र बोथरा, राजेश गुगळे, सचिव विश्वनाथ कासट, अशोक भंडारी, सल्लागार रमेश सोनीमंडलेचा, मिलींद जांगडा, संजय लोढा, विपुल शेटिया उपस्थित होते.

निवेदनात नमूद केले आहे की, अहिल्यानगर मधील बाजारपेठ राज्यातील मोठी बाजारपेठ म्हणुन पासुन प्रसिध्द आहे. या बाजारपेठांमध्ये जिल्हयातून तसेच आजुबाजुच्या जिल्हयातील व तालुक्यातील दुकानदार व व्यापारी माल खरेदी विक्रीसाठी येत असतात. त्यामुळे साहजीकच बाजारपेठेत मोठया प्रमाणात माल वाहतुकीसाठी तीन–चार चाकी छोटे, मोठे टेम्पो येत असतात त्यामुळे बाजारपेठेत वाहतुकीची कोंडी होते.

या बाजारपेठेत ठरावीक वेळेतच पोलीस अधूनमधून उभ्या असलेल्या मालवाहतुकदाराच्या गाडीचा फोटो काढुन ऑनलाईन दंड करत आहेत. हे प्रकार गेले अनेक दोन महिन्यांपासुन चालु असल्याने मालवाहतुक टेम्पो, गाडीचालक कोणताही माल घेण्यासाठी व देण्यासाठी बाजारपेठेत येण्यास तयार नाही. याचा बाजारपेठेवर खुपमोठा व्यवसायीक परिणाम होवुन बाजारपेठ बंद पडण्याची वेळ आली आहे. त्यामुळे व्यापा–यांवर खुपमोठा अन्याय होत आहे. बाजारपेठेतील वाहन चालकाला विनाकारण दंड भरावा लागत असल्याने त्याचा व्यवसाय बंद पडत आहेत व कुटूंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहुन उपासमारीची वेळ येणार आहे. त्यामुळे पोलीसांनी ऑनलाईन दंड करण्याची कारवाई त्वरीत थांबवण्यासाठी योग्य तो आदेश द्यावेत. बाजारपेठेत पोलिसांनी थेट दंड न आकारता वाहतुक सुरळीत कशी करता येईल याकडे लक्ष देवुन वाहन चालकाला व व्यापाऱ्यांना सहकार्य करावे.

बाजारपेठेत मंगलगेट पोलीस चौकी आहे. अनेक वर्षांपासून ती बंद असते व येथे पोलीस दिसत नाही. ही पोलीस चौकी त्वरित चालू करून तेथे पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी. तसेच बाजारपेठांमध्ये पोलिसाची गस्त वाढवावी जेणेकरून बाजारपेठेतील चोऱ्यांना आळा बसेल.

# जिल्हा पोलीस को. ऑफ क्रेडिट सोसायटीच्या चेअरमनपदी सविता खताळ व व्हाईस चेअरमनपदी मनीषा काळे, सचिवपदी प्रज्ञा प्रभुणे यांची एकमताने निवड


जिल्हा पोलीस को. ऑफ क्रेडिट सोसायटीच्या चेअरमनपदी सविता खताळ व व्हाईस चेअरमनपदी मनीषा काळे, सचिवपदी प्रज्ञा प्रभुणे यांची एकमताने निवड करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

नगर – जिल्ह्यातील पोलीस बांधव सभासदांच्या आर्थिक हितासाठी काम करणाऱ्या अहिल्यानगर जिल्हा पोलीस को–ऑप क्रेडिट सोसायटीच्या चेअरमनपदी सविता खताळ यांची निवड झाली असून त्यांच्या नावाची सूचना अभिजीत अरकल यांनी मांडली तर अनुमोदन वैभव झिने यांनी दिले तर व्हाईस चेअरमन पदी मनीषा काळे यांची निवड झाली असून सूचक म्हणून जावेद शेख तर अनुमोदन भीमराज खर्से यांनी दिले तर सचिव पदी प्रज्ञा प्रभुणे यांची निवड झाली असून मावळते चेअरमन बाळासाहेब भोपळे तर मावळते व्हाईस चेअरमन राहुल द्वारके यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी संचालक रिचर्ड रघुवीर गायकवाड, रेवननाथ दहिफळे, सचिन शिरसाट, जावेद शेख, अभिजीत अरकल, भीमराज खर्से, संदीप जाधव, संदीप घोडके, वैभव झिने, दीपक घाटकर, लिपिक प्रकाश पाठक आदी उपस्थित होते

चेअरमन सविता खताळ म्हणाल्या की, जिल्हा पोलीस बांधव सभासदांसाठी सोसायटी काम करत असून त्यांच्या हिताचे निर्णय घेतले जात असून त्यांना तातडीने दहा लाखापर्यंत कर्ज दिले जाते सभासदांच्या विश्वासाच्या जोरावर संस्था स्व भांडवली आहे सभासदांना घरबसल्या सोसायटीच्या सुविधा मोबाईलवर पाहता याव्यात यासाठी संस्थेचा कारभार ऑनलाईन आहे, संचालक मंडळांनी संस्थेचा चांगल्या प्रकारे कामकाज केल्यामुळे संस्था नेहमीच अ वर्गात असते, सभासद संचालक मंडळ यांच्या विश्वासामुळे चेअरमन पदावर काम करण्याची संधी महिलेला मिळाली त्या माध्यमातून चांगले काम करू असे त्या म्हणाल्या

व्हाईस चेअरमन मनीषा काळे म्हणाल्या की, पोलीस बांधव सभासद सोसायटीच्या चेअरमन व्हाईस चेअरमन व सचिवपदी महिलांना काम करण्याची संधी मिळाली याबद्दल मी संचालक मंडळाचे आभार मानते सोसायटीने सभासदाच्या सुरक्षा कवच पॉलिसी सुरू केले असल्यामुळे मयत सभासदाचे कर्ज या मधून माफ केले जाणार आहे असे त्या म्हणाल्या.

प्रज्ञा प्रभुणे म्हणाल्या की, सभासदांनी मोठ्या विश्वासाने तीन वर्षांपूर्वी १५/० असा मोठा विजय मिळवून दिला पहिल्या वर्षी संदीप घोडके चेअरमन तर व्हॉइस चेअरमन वैभव झिने यांनी काम केले होते, प्रत्येक वर्षी चेअरमन, व्हाईस चेअरमन पदासाठी निवडणूक होत असते या माध्यमातून सर्व संचालकांना काम करण्याची संधी मिळत असते, सर्वांच्या एकजुटीमुळे व सोसायटीचा पारदर्शक कारभारामुळे संस्था यशाच्या शिखराकडे वाटचाल करीत असल्याचे त्या म्हणाल्या.

# महाराष्ट्र अॅण्ड गोवा नोटरी असोसिएशनचे ९ ऑगस्ट रोजी पुणे येथे होणार अधिवेशन


ॲड. सुमतीलाल बलदोटा ॲड. हाफिज जहागिरदार ॲड. अनिता दिघे

नगर – महाराष्ट्र अॅण्ड गोवा नोटरी असोसिएशनचे ९ ऑगस्ट रोजी पिंपरी चिंचवड येथील रामकृष्ण मोरे सभागृहात पाचवे अधिवेशन होणार आहे. यात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, भारत सरकारचे कायदामंत्री तसेच उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती असोशिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. सुमतीलाल बलदोटा यांनी दिली.

महाराष्ट्रातील सर्व जुन्या व नव्या नोटरी वकिलांनी अधिवेशनात सहभागी व्हावे, असे आवाहन ॲड. सुमतीलाल बलदोटा, जिल्हाध्यक्ष ॲड. हाफीज जहागीरदार आणि महिला जिल्हाध्यक्ष ॲड. अनिता दिघे यांनी केले आहे. माहितीसाठी ॲड. संदिप पाखरे, ॲड.गोरक्षनाथ तांदळे, ॲड. युवराज पोटे, ॲड.सुधीर भागवत यांच्याशीही संपर्क साधावा.

अधिवेशनास उपस्थित राहण्याचे आवाहन असोसिएशनचे प्रदेश अध्यक्ष ॲड. सय्यद सिकंदर अली यांनी केले आहे.

दरम्यान, ॲड. सुमतीलाल बलदोटा यांची महाराष्ट्र अॅण्ड गोवा नोटरी असोसिएशनच्या प्रदेश उपाध्यक्ष आणि प्रवक्तापदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच ॲड. हाफीज जहागीरदार यांची अहमदनगर जिल्हाध्यक्षपदी, ॲड. अनिता दिघे यांची महिला जिल्हाध्यक्षपदी, ॲड. सुधीर भागवत यांची जॉईंट सेक्रेटरीपदी, ॲड. गोरक्षनाथ तांदळे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी, ॲड. युवराज पोटे, ॲड. संदिप पाखरे आणि ॲड. स्नेहल बनकर यांची महिला कार्यकारिणी सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे, ॲड. भुषण ब–हाटे, ॲड. वैभव आघाव, ॲड. बुरके, ॲड. महेश काळे, ॲड. सुनिल मुंदडा, ॲड. अनुराधा येवले, ॲड. बी. बी. पालवे, ॲड. मनोज गायकवाड, ॲड. अशोक कोठारी (सेंट्रल बार), ॲड. सतिश गुगळे, ॲड. रविंद्र बेद्रे, ॲड. सुरेश लगड, ॲड. राजेश कावरे, ॲड. किशोर देशपांडे, ॲड. जयंत भापकर आदींनी अभिनंदन केले आहे.माहितीसाठी ९८२२१८७७७६, ९४२२२२००७१, ७२२०००९००१.


जिल्हा परिषदेतील कास्ट्राईब महासंघाच्या कार्यालयात राज्य अध्यक्ष एन.एम. पवळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

# कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर

नगर – कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची नुकतीच निवड करण्यात आली. जिल्हा परिषदेतील कास्ट्राईब महासंघाच्या कार्यालयात राज्य अध्यक्ष एन.एम. पवळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. या कार्यक्रमात पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. नाशिक विभागीय उपाध्यक्षपदी राजीव यशवंत साळवे, जिल्हा कार्याध्यक्षपदी समीर वाघमारे, शहरात उपाध्यक्षपदी विनोद बाळू शिंदे व कार्यालयीन जिल्हा सचिवपदी बाळू राधू शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी राज्य उपाध्यक्ष वसंत थोरात, शहराध्यक्ष श्याम गोडळकर, लखन गाडे, सागर पवार आदी उपस्थित होते.

नाशिक विभागीय उपाध्यक्ष राजीव साळवे हे एसटी महामंडळ मध्ये विभाग नियंत्रक म्हणून कार्यरत होते. कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते सातत्याने योगदान देत आहेत. जिल्हा कार्याध्यक्ष के.के. जाधव यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या रिक्तपदावर समीर वाघमारे यांची नियुक्ती करण्यात आली असून, जिल्हा परिषदेत यांत्रिकी विभागात (पाणीपुरवठा) कार्यरत आहेत. शहर उपाध्यक्ष विनोद शिंदे महापालिकेत आरोग्य विभागात तर कार्यालयीन जिल्हा सचिव बाळू शिंदे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात कार्यरत आहेत.

या बैठकीत संघटनेसमोरील आव्हाने, वेतन, प्रमोशन, सेवा सुरक्षा, बदल्या, पेंशन आदी प्रश्नांबाबत चर्चा करण्यात आली. सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन संघटनेला बळ देण्याचे आवाहन उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केले.

# भारतीय जनता पार्टी सावेडी मंडल आयोजित मंगळागौर स्पर्धा उत्साहात


भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलाच्या वतीने आयोजित मंगळागौर स्पर्धेतील विजेत्या श्रावणी ग्रुपला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.

नगर – भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलातर्फे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या मंगळागौर स्पर्धा उत्साहात पार पडल्या. यामध्ये अहिल्यानगर शहरातील एकूण १३ संघांतर्फे २२० महिलांनी सहभाग नोंदवला. माऊली सभागृह सकाळपासूनच तुडुंब भरलेले होते. महिलांची नाव नोंदणी केल्यानंतर हळदी – कुंकू लावूनच आत सोडले जात होते. स्पर्धक महिला नऊवारी साडी, नाकात नथ घालूनच आल्या होत्या. यानिमित्ताने मोठी रांगोळी काढण्यात आली होती. सौ. धनश्रीताई विखे पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर माजी नगरसेविका मनिषा बारस्कर – काळे यांच्यासोबत पारंपारिक फुगडी खेळून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

यानिमित्ताने दोन संघांच्या स्पर्धेदरम्यान शहरातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या १० महिलांचा महिला पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक सावेडी मंडलाध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांनी केले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, माजी शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, वसंत लोढा सूत्रसंचालन प्रसन्न पाठक व शारदा होशिंग यांनी केले. रेणुका करंदीकर यांनी आभार मानले. या स्पर्धेचे यशस्वीतेसाठी महिला मोर्चाचे प्रियाताई जानवे, गीताताई गिल्डा, रेणुका करंदीकर, शारदा होशिंग, वंदना पंडित, प्रतिक्षा रसाळ, कालिंदीताई केसकर, सविताताई मोरे, अर्चना बनकर, सोनाली फाटक, सुरेखा जंगम, राखी आहेर, पल्लवी जाधव, श्वेता झोंड, उज्वला भांगे, प्रज्ञा जोशी, सुवर्णा महापुरुष, रामदास आंधळे, साहिल शेख, संपतराव नलवडे, वैभव झोटिंग, सुधीर मंगलारप, अनिरुद्ध घैसास, पुष्कर कुलकर्णी, युवा मोर्चा अध्यक्ष अभिषेक वाकळे, हेमंत पवार, अक्षय गांगर्डे, अभिजीत गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रोख रु. २१,००० व ट्रॉफी श्रावणी ग्रुपला, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक रोख रु. १५,००० व ट्रॉफी क्लासिक मंगळागौरी ग्रुपला तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक रोख रु. ११,००० व ट्रॉफी जिजाऊ ग्रुपला मिळाले. यामध्ये तीन उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. त्यामध्ये दुर्गा संस्कृती ग्रुप व समर्थ ग्रुप यांना प्रत्येकी रोख रू. ३,००० व ट्रॉफी तसेच श्रावणसखी या ग्रुपला रोख रु. ३,००० व ट्रॉफी देण्यात आली. उत्कृष्ट उखाणे स्पर्धेमध्ये श्रिया देशमुख यांना स्वरचित उखाणे प्रथम क्रमांकासाठी पैठणी व ट्रॉफी, तर वंदना साबळे यांना द्वितीय क्रमांकासाठी पैठणी व ट्रॉफी मिळाली. तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक सौ. अश्विनी कांबळे यांना भेट वस्तू देण्यात आली.

उत्कृष्ट पारंपारिक वेशभूषेसाठी सौ. विद्या बडवे यांना पैठणी मिळाली.


मनपा माजी सभागृह नेते अशोक बडे यांच्या संकल्पनेतून व प्रयत्नांतून प्रभागातील नागरिकांना डस्टबिन व कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. विशेषतः महिलांसाठी राबवण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. (छाया – लहू दळवी)

# प्रभागातील नागरिकांना डस्टबिन आणि कापडी पिशव्यांचे वाटप

**प्रभागातील नागरिकांना स्वच्छता अभियानात सामावून घेण्याचा विधायक उपक्रम**

नगर – शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यपूर्ण ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. याच उद्देशाने मनपा माजी सभागृह नेते अशोक बडे यांच्या संकल्पनेतून व प्रयत्नांतून प्रभागातील नागरिकांना डस्टबिन व कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. विशेषतः महिलांसाठी राबवण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. डस्टबिन वाटपाच्या माध्यमातून घरातील ओला व सुका कचरा योग्य पद्धतीने घंटागाडीतच टाकण्याचे आवाहन करण्यात आले, जेणेकरून रस्त्यावर कचरा साचणार नाही, आणि संपूर्ण परिसर स्वच्छ राहील. हे केवळ स्वच्छतेसाठीच नव्हे तर नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठीही एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे अशोक बडे यांनी सांगितले. आज प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. त्यावर उपाय म्हणून महिलांना कापडी पिशव्यांचे वाटप करून प्लास्टिकमुक्त शहर घडवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.

अशोक बडे म्हणाले की, पर्यावरण रक्षण आणि स्वच्छ परिसर ही काळाची गरज आहे. प्लास्टिकमुक्त शहर बनवण्यासाठी प्रत्येक महिलेनं पुढाकार घ्यावा, आणि समाजात कापडी पिशवी वापराची लोकचळवळ निर्माण करावी. कार्यक्रमाच्या यशस्वीतेत स्थानिक महिलांचा सहभाग लक्षणीय होता. विविध वयोगटांतील महिला, युवती, गृहिणी यांनी स्वतःहून सहभाग नोंदवून सामाजिक जाणिवा जागविल्या.

स्वच्छ प्रभाग, सशक्त महिला – डस्टबिन आणि कापडी पिशव्यांचे वितरण कार्यक्रम अशोक बडे यांच्या हस्ते झाले. यावेळी भाऊसाहेब खेडकर, यासीन शेख, उत्तम बनकर, आनंदा कालेकर, सुभाष लांडे, दिलीप पेटकर, वाघ काका, नानासाहेब पाटील, भास्कर दहिफळे, शहादेव गवळी, कुमार साहेब, बबन कोतकर, प्रकाश चव्हाण, बबलू फुंदे, येणारे दादा, खेडकर मामा, शेळके मामा, सोनूले मामा, रामनाथ वाकचौरे, बिरजू बाचकर, मनीषा गरजे, उषा बनकर, निता वाकचौरे, कालेकर, प्रतिभा चव्हाण, पुष्पा शिंदे, वंदना व्यवहारे, रेखा शिंदे, शोभा लांडगे, सुनिता गावडे, सुनीता ओगले, कमल करपे, शोभा जगदाळे, उषा पालवे, पूजा चव्हाण, सुनिता दरेकर, अर्चना महांडुळे, वैशाली शिंदे, पुष्पा गायकवाड, ज्योती खेडकर, मीरा जाधव, मनीषा केदारी, प्रतीक्षा घुले, निशा शिरसाट, योगिता पवार, राजश्री करपे, सविता रोडे, लांडे, मंदा येणारे, पूजा भुजबळ, स्वाती चितळकर, अर्चना सांगळे, सविता गिरणे, लीला तांबे, अनिता केदार, राधा धोंगडे उपस्थित होते.

## योगशिक्षक पदविका प्रवेश वर्गासाठी १० ऑगस्टपर्यंत मुदत

नगर – यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाद्वारे घेण्यात येणाऱ्या योग शिक्षक पदविका (P126) अभ्यास क्रमाची २०२५–२६ या वर्षाकरिता प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली असून १० ऑगस्ट पर्यंत मुदत वाढ करण्यात आली आहे, असे अभ्यासक्रमाचे समन्वयक प्राचार्य अडाणे यांनी सांगितले.

सदर अभ्यासक्रमास युजीसी मान्यता असल्यामुळे ज्या साधकास योगामध्ये आपले करियर करावयाचे आहे, त्यांना या परीक्षेचा भरपूर फायदा होईल. फक्त रविवारी वर्ग असल्याने तुमचा सध्याचा अभ्यासक्रम चालू ठेवून हा डिप्लोमा पूर्ण करता येईल. या अभ्यासक्रमास योग विद्या गुरुकुल नाशिक अंतर्गत योग महाविद्यालयात नाशिक यांना मान्यता मिळाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी ९४०५०००६८०, ९८२३७८१२४६, ७३८७४ ४२२८८ यावर संपर्क करावा.


अहिल्यानगर येथील ओल्ड मुंबई नॅचरल आईस्क्रीम येथे मराठी सिने सृष्टीतील अभिनेते व दिग्दर्शक मिलिंद शिंदे यांनी सदिच्छा भेट देऊन आईस्क्रिम चा स्वाद घेतला व शुभेच्छा दिल्या.

## विनयभंगच्या गुन्ह्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता

नगर – वाणीनगर, पाईपलाईन रोड येथे भाजीपाला खरेदी करण्यासाठी गेलेल्या महिलेस शिवीगाळ करून महिलेस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याप्रकरणी सचिन भोजने यांच्याविरूद्ध तोफखाना पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड संहिता कलम ३५४ व इतर कलमन्वये गुन्हा दाखल झालेला होता. पोलीस तपासी अधिकारी यांनी गुन्ह्याचा सखोल तपास करून जिल्हा न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. आरोपीच्यावतीने ॲड. सचिनदेवा पाठक गुरूजी यांनी काम पाहिले. फिर्यादी व इतर साक्षीदार यांचा जबाब व उलटतपासीत असे कृत्य केल्याचे निष्पन्न झाले नाही. तसेच ॲड. सचिन पाठक यांनी केलेला युक्तिवाद व सत्य परिस्थिती न्यायालयाच्या नजरेस आणून दिल्यामुळे सदर आरोपीस सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्त केले.


नगर तालुक्यातील निमगाव वाघा ग्रामपंचायतीच्या सरपंच आणि सदस्यांचा भानुदास कोतकर यांच्या वतीने सत्कार समारंभात गौरव करण्यात आला.

# गावच्या विकासासाठी सरपंच व सदस्यांचे योगदान कौतुकास्पद

**भानुदास कोतकर यांचे प्रतिपादन; निमगाव वाघाच्या सरपंच आणि सदस्यांचा सन्मान**

नगर – ग्रामपंचायत ही लोकशाहीची पहिली पायरी आहे. गावाचा सर्वांगीण विकास हे ग्रामपंचायतीचे मुख्य उद्दिष्ट असते. आज आपल्यासमोर उभे असलेले हे सर्व सदस्य गावच्या विकासासाठी योगदान देत असल्याचे भानुदास कोतकर यांनी कौतुक केले. उज्वला कापसे यांच्यासारख्या महिलांना नेतृत्वाची संधी मिळणे ही गावाला विकासात्मक दिशा दाखवते. तसेच नाना डोंगरे यांनी खेळाच्या माध्यमातून तालुक्यात योगदान दिले आहे. त्यांच्या फेरनिवडीने क्रीडा क्षेत्राला नवा उत्साह देणारी असल्याचे त्यांनी सांगितले.

नगर तालुक्यातील निमगाव वाघा ग्रामपंचायतीच्या नवनिर्वाचित सरपंच आणि सदस्यांचा भानुदास कोतकर यांच्या वतीने सत्कार समारंभात गौरव करण्यात आला. तर ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांची नगर तालुका क्रीडा समितीच्या उपाध्यक्षपदी फेरनिवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. केडगाव येथील कोतकर फार्म हाऊस येथे सत्कार समारंभ सोहळ्याप्रसंगी नवनिर्वाचित सरपंच उज्वला कापसे, माजी सरपंच लताबाई फलके, उपसरपंच किरण जाधव, उद्योजक दिलावर शेख, ग्रामपंचायत सदस्य संजय कापसे, प्रमोद जाधव, दीपक गायकवाड, रूपाली जाधव, दादा गायकवाड, अजय ठाणगे, एकनाथ जाधव, बापू फलके, ऋषी जाधव, गणेश सातपुते, कुमार होळकर आदी उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे यांनी भानुदास कोतकर यांच्या राजकारण व समाजकारण मधील जुन्या आठवणींना उजाळा दिला. तर केडगावच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान स्पष्ट केले.

# छत्रपती अभियांत्रिकी आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर


छत्रपती अभियांत्रिकी आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

नगर – नेप्ती येथील छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालय आणि रोटरी क्लब प्रियदर्शनी, अहिल्यानगर तसेच जनकल्याण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरामधून समाजकार्याची भावना जागृत करण्याचा अतिशय सुंदर संदेश विद्यार्थ्यांपर्यंत या माध्यमातून पोहोचतो आणि त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना व शिक्षकांना त्यांच्या येणाऱ्या भविष्यामध्ये उपयुक्त ठरतो, असे मत अहिल्यानगर येथील रोटरी क्लब प्रियदर्शनी च्या अध्यक्षा अनुराधा आठरे यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी अशा प्रकारचे विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे सामाजिक उपक्रम महाविद्यालय यापुढे देखील सातत्याने राबवतच राहील, असे प्रतिपादन केले. रक्तदान या विषयावर विद्यार्थ्यांशी बोलत असताना आपल्या भाषणामध्ये हे देखील नमूद केले की, दिवसेंदिवस रक्ताची गरज वाढत असून, मोठ्या प्रमाणात रक्त संकलित होणे ही काळाची गरज बनली आहे.

जनकल्याण रक्तपेढी येथील जनसंपर्क अधिकारी शरद बळे यांनी रक्तदान चळवळ अधिक सक्षमपणे समाजामध्ये रुजवण्यासाठी विद्यार्थ्यांकडून होत असलेले कार्य प्रेरणादाणी आहे, असे मत व्यक्त केले.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे या कार्यक्रमासाठी पूर्वतयारी करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अक्षय देखणे यांचे मार्गदर्शन लाभले. रक्तदान शिबिरामध्ये रक्तदात्यांना जनकल्याण रक्तपेढी द्वारे प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमासाठी कुंदा हुळबे, मीनल बोरा, ज्योती गांधी, एस. एम. मोरे, लीना मोरे, डॉ. ओजस मुनोत, किशोर यादव, किरण शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी डॉ. एम. के. भोसले (प्रथम वर्ष समन्वयक), प्रा. एस. एम. वाळके (ई अॅण्ड टी सी विभाग प्रमुख), प्रा. पी. जी. निकम (सिव्हील विभागप्रमुख), प्रा. ए. बी. काळे (मेकॅनिकल विभागप्रमुख), प्रा. एस. पी. विधाते (कम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख), डॉ. व्ही. व्ही. पाटील (ए.आय. विभागप्रमुख), प्रा. बी. एन. खरड (रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन विभाग प्रमुख, प्रा. पी. आर. मुटकुळे (ए आय एम एल विभागप्रमुख) यांच्यासमवेत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.




जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित मोफत स्त्रीरोग, गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिराचे उद्‌घाटन करताना मिनल पारख.

# बालकांच्या सदृढतेसाठी व मातेच्या आरोग्यासाठी ‘आनंदऋषीजी हॉस्पिटल’चा दिशादर्शक उपक्रम

## मिनल पारख यांचे प्रतिपादन; मोफत स्त्रीरोग, गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद

नगर – व्याधीने ग्रासलेल्या दीन–दुबळ्या रुग्णांना आनंदऋषीजी हॉस्पिटल नवजीवन देण्याचे काम करीत आहे. या हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या पाठिशी आनंदऋषीजींचे कृपा आशिर्वाद असल्याने रुग्ण बरे होऊन घरी जातात. मोठ्या श्रद्धेने आलेल्या रुग्णांना दवा आणि दुवा एकत्र मिळते. समाजाच्या निरोगी आरोग्यासाठी, जन्मणाऱ्या बालकांच्या सदृढतेसाठी आणि मातेच्या आरोग्यासाठी दिली जाणारी आरोग्यसेवेचा उपक्रम दिशादर्शक आहे. समाजात कुपोषणमुक्त बालकांसाठी हॉस्पिटलने महत्त्वाचे पाऊल उचलले असल्याचे प्रतिपादन उद्योजिका मिनल पारख यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आयोजित मोफत स्त्रीरोग, गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्‌घाटनाप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अभय पारख, अतुल पारख, बीडचे अशोक लोढा, जवाहरलाल बोरा, उज्वल कोटेचा, बाळू संचेती, किशोर नहार, संतोष बोथरा, सतीश लोढा, मानकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, स्त्री रोग तज्ञ डॉ. सोनल बोरुडे, डॉ. हिरल चौधरी आदी उपस्थित होते.

अशोक लोढा म्हणाले की, प्रत्येकाने योगदान देऊन समाजाचे दायित्व निभावले पाहिजे. आनंदऋषीजी हॉस्पिटलशी जोडलेले गेलेला प्रत्येक सदस्य व डॉक्टर आरोग्यसेवेचे व्रत सांभाळत आहे. प्रत्येक रुग्णाच्या हृदयातून चांगली आरोग्य सेवा मिळाल्याची भावना व्यक्त होते. बीड मधील सेंटरद्वारे सोनोग्राफी, अँजिओग्राफी, डायलिसिस, नेत्र तपासणी आदी सुविधा दिल्या जात आहे. नगरच्या धर्तीवर बीडमध्ये भव्य हॉस्पिटल उभे राहणार असून, याद्वारे गोर–गरीबांची आरोग्यसेवा घडणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या शिबिरात स्त्री रोग तज्ञ डॉ. सोनल बोरुडे व डॉ. हिरल चौधरी यांनी २१५ महिलांची आरोग्य तपासणी केली. या शिबिराला महिलांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शिनीच्या अध्यक्षा मिनल बोरा यांना स्टार वुमन ऑफ द इयर पुरस्कार प्रदान



स्टार वुमन ऑफ द ईयर इन रोटरी हा पुरस्कार स्वीकारताना पास्ट डिस्ट्रिक्ट फर्स्ट लेडी रो. निर्मला साबू, आयपीडीजी रो. डॉ. सुरेश साबू, मिनल बोरा, ईश्वर बोरा, डीजीएन रो. क्षितिज झावरे.

नगर – रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या विजयोत्सव पुरस्कार समारंभात रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शिनीच्या अध्यक्ष रोटेरियन मिनल बोरा यांना महिलांसाठीच्या स्टार वुमन ऑफ द इयर इन रोटरी या सर्वोच्च रोटरी पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार संपूर्ण जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट महिला अध्यक्ष म्हणून दिला जातो. सदर पुरस्कार समारंभ जालना येथे पार पडला. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून पीडीजी रो. मोहन पालेशा, पीडीजी रो. शिरीष रायते, रो. दादा साळुंखे, रो. किशोर पावडे, रो. विष्णू मोंढे, रो. हरीश मोटवानी, रो. रुक्मेश जाखोटिया, विद्यमान जिल्हा प्रांतपाल रो. सुधीर लातूरे तसेच कौन्सिल ऑफ गव्हर्नर्सचे सदस्य डीजीई रो. जयेश पटेल व डीजीएन रो. क्षितिज झावरे उपस्थित होते. तत्काळ जिल्ह्याचे प्रांतपाल पीडीजी रो. डॉ. सुरेश साबू आणि डिस्ट्रिक्ट फर्स्ट लेडी रो. निर्मला साबू यांच्या हस्ते हा गौरव प्रदान करण्यात आला.

मिनल बोरा यांनी सांगितले की, या संपूर्ण यशाचे खरे श्रेय माझ्या क्लबच्या सर्व सदस्यांचे आहे. माझ्या सहकारी सदस्यांनी आईसारखी माया लावून मला प्रत्येक प्रकल्पात माझी साथ दिली आणि खंबीरपणे माझ्या मागे उभ्या राहिल्या. त्यांनी सचिव रो. स्वाती गुंदेचा, चार्टर सदस्य रो. यासमिन जलनावाला, चार्टर अध्यक्ष रो. कुंदा हळबे, क्लब ट्रेनर रो. नीना मोरे, तसेच रो. प्रतिभा धूत यांचा खास उल्लेख केला. श्रीगोपाल धूत फाऊंडेशनच्या सीएसआर निधीद्वारे त्यांनी हॅपी स्कूल प्रकल्पांअंतर्गत पेव्हर ब्लॉक बसवणे, स्टेज बांधकाम करणे, एफआरपी टॉयलेट ब्लॉक, युवान फाउंडेशन संचलित महिलांच्या वसतिगृह करिता संपूर्ण वर्षाचे पालकत्व इत्यादी कामे तसेच रो. छाया फिरोदिया यांच्या प्रयत्नांतून व त्यांच्या मार्फत सैनिटरी पैड वेंडिंग मशीन व इतर प्रोजेक्ट यशस्वीपणे पार पाडली. त्याचबरोबर रो. आशा फिरोदिया, रो. अनुराधा आठरे, रो. सविता काळे, आणि रो. लता भगत यांनी टीआरएफ (The Rotary Foundation) मध्ये दिलेल्या उच्च देणग्यांनी क्लबला पीएचएफ आणि रोटरी जिल्ह्यात विशेष स्थान मिळवून दिले.

प्रत्येक प्रकल्पात क्लबच्या सर्व सदस्यांचा सक्रिय सहभाग राहिला. सर्वांनी मिळून एकजुटीतून यश याचा खरा अर्थ साकार केला. त्यांनी हेही नमूद केले की, या प्रवासात माझ्या यशामागे माझे पती – क्लबचे ‘फर्स्ट मॅन’ रो. ईश्वर बोरा यांचा आणि माझ्या कुटुंबाचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी माझ्या यशस्वितेकरिता स्वतःचे आनंदाचे क्षण बाजूला ठेवले आणि प्रत्येक क्षणी माझा पाठिंबा दिला. त्यांनी यावेळी क्लबच्या सहाय्यक प्रांतपाल रो. किरण कालरा यांचा देखील आवर्जून उल्लेख केला व त्यांनी वर्षभर जिल्हा प्रांतपाल व क्लब मधील दुवा म्हणून कार्य करत शक्य ते सर्व सहकार्य करत क्लब च्या प्रत्येक उपक्रमात हिरहिरेने सहभागी नोंदवत क्लबच्या यशस्वी प्रोजेक्ट बाबत जिल्हा प्रांतपाल यांना न चुकता रिपोर्टिंग करत आपले कर्तव्य बजावल्याने प्रियदर्शिनी क्लब ला हे यश संपादन करता आले.

या सोहळ्यात रोटरी विश्वातील सुमारे ६०० हून अधिक रोटेरियन्स जालना उपस्थित होते.



प्रामाणिकपणाबद्दल दिलेले अभिनंदन पत्र कॅशियर तगारे यांना प्रदान करताना बँकेचे अधिकारी व कर्मचारी.

# मर्चंटस् बँकेच्या कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा

## खात्यात अधिक भरणा झालेली २० हजार रुपयांची रक्कम खातेदारास परत

नगर – अहमदनगर मर्चंटस् को ऑप. बँकेच्या एमआयडीसी शाखेत एका खातेदाराने नजरचुकीने २० हजार रुपयांचा अतिरिक्त भरणा केला. कॅशियर कम क्लार्क राकेश तगारे यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी प्रामाणिकपणे ही बाब कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देत संबंधित खातेदाराला बोलावून घेत अतिरिक्त जमा झालेली रक्कम परत केली. या प्रामाणिकपणाबद्दल बँकेचे चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी तगारे यांना अभिनंदन पत्र पाठवून कौतुक केले आहे.

याबाबत माहिती अशी की, मर्चंटस् बँकेच्या एमआयडीसी शाखेत मे.शिवलक्ष्मी पेट्रोलियम फर्मचे खाते आहे. ३० जुलै रोजी या फर्मच्या खात्यात भरणा करण्यासाठी आलेल्यांकडून २० हजारांची जादा रक्कम भरण्यात आली. कॅशियर तगारे यांच्या निदर्शनास ही बाब येताच त्यांनी शाखेतील कनिष्ठ अधिकारी संतोषसिंग ठाकूर यांना सदर बाब सांगितली. ठाकूर यांनी शहानिशा करून संबंधित खातेदारास बोलावून घेत जादा आलेली रक्कम परत केली.

# वास्तुशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी आय.एस.डी.टी.त प्रवेश सुरू

## विनायक देशमुख यांची माहिती; इंजिनीअर्स, आर्किटेक्ट यांना संधी



आय.एस.डी.टी.च्या नियोजन बैठकीत मार्गदर्शन करताना विनायक देशमुख.

नगर – इन्स्टिट्यूट फॉर स्टडीज इन डिझाईन अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी (आय.एस.डी. टी.) संस्थेत यावर्षीपासून वास्तुशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येत असून त्याची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष विनायक देशमुख यांनी दिली.

आय.एस.डी.टी. संस्थेच्या वार्षिक नियोजनाची बैठक श्री. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच झाली. त्यावेळी श्री.देशमुख बोलत होते.

यावेळी संस्थेच्या संचालिका पूजा देशमुख, प्राचार्य अरुण गावडे, फॅशन डिझायनिंग विभागप्रमुख पूजा पतंगे व अन्य प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रारंभी संचालिका पूजा देशमुख यांनी मागील वर्षाचा शैक्षणिक व प्रशासकीय अहवाल सादर केला.

यावेळी बोलताना श्री. देशमुख म्हणाले, संस्थेने २१ वर्षे पूर्ण करून २२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. या प्रदीर्घ कालावधीत संस्थेने शैक्षणिक गुणवत्ता कायम राखली असून त्यामुळेच संस्थेला विद्यार्थी आणि पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आगामी काळातही इंटेरिअर डिझायनिंग व फॅशन डिझायनिंग या अभ्यासक्रमाची गुणवत्ता उच्च प्रतीची राखण्यासाठी थिअरी व प्रॅक्टिकल शिक्षणासोबतच विविध विषयांवरील कार्यशाळा, डिझायनिंग क्षेत्रातील तज्ज्ञांची व्याख्याने, देशभरातील नामांकित संस्था आणि स्थापना यांना भेटी, स्वानुभव वार्षिक प्रदर्शन व ब्लॉसम फॅशन शो या उपक्रमांमध्ये विशेष लक्ष देऊन सर्वांनी सहभागी व्हावे.

वास्तुशास्त्र या विषयाबाबत संस्थेने अभ्यासक्रम सुरू करावा, अशी इंजिनीअर्स, आर्किटेक्ट, इंटिरियर डिझायनर्स, कॉन्ट्रॅक्टर्स अशा विविध घटकांकडून अनेक दिवसांपासून मागणी होत होती. या मागणीच्या अनुषंगाने यावर्षीपासून अल्पमुदतीचा वास्तुशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. या अभ्यासक्रमाची समन्वयाची जबाबदारी प्राचार्य अरुण गावडे यांच्याकडे दिली असल्याचे श्री. देशमुख यांनी सांगितले.

या अभ्यासक्रमाबद्दल बोलताना श्री. गावडे म्हणाले, दोन महिन्यांच्या कालावधीच्या या अभ्यासक्रमाचे वर्ग आठवड्यातील दोन दिवस म्हणजे शुक्रवार व शनिवारी चालविले जाणार आहेत. त्यामुळे व्यावसायिक, इंजिनियर्स, डिझायनर्स या क्षेत्रात ज्ञान मिळवण्यास इच्छुक असणाऱ्यांना अभ्यासक्रम करणे शक्य होईल. या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी संस्थेशी (०२४१–२४३००२३) असे आवाहन श्री.गावडे यांनी केले.

यावेळी झालेल्या चर्चेत महेश बालटे, चेतन वाडेकर, प्रणव भोसले यांच्यासह निकिता बेद्रे, कोमल वांडेकर, पूर्वा भंडारी आदींनी सहभाग घेतला.

आजच्या या वार्षिक बैठकीचे नियोजन रोहन चारगुंडी यांनी केले.

# स्नेहालयात रंगली राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा, अवघ्या पाच मिनिटांत सोडविले गणिताचे पेपर



एमआयडीसी येथील स्नेहालयात युनिव्हर्सल अबॅकस अ‍ॅण्ड वैदिक मॅथ्स् असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेली राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा उत्साहात पार पडली.

नगर – एमआयडीसी येथील स्नेहालयात युनिव्हर्सल अबॅकस अ‍ॅण्ड वैदिक मॅथ्स् असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेली राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सकाळच्या सत्रात घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी मोठमोठी गणिते झटपटपणे सोडवित अवघ्या ५ मिनीटाच्या आतमध्ये आपला पेपर सोडवित उपस्थितांना अवाक केले.

ही स्पर्धा ज्युनिअर, मास्टर ज्युनिअर, लेवल १ ते ५ व वैदिक मॅथ्स् या गटात घेण्यात आली. ५ मिनीटाच्या राऊंडमध्ये अवघड गणिती प्रक्रियेचे पेपर विद्यार्थ्यांनी अत्यंत जलदगतीने सोडविली. यामध्ये अहिल्यानगर, अकोला, काष्टी, बीड, श्रीरामपूर आदी जिल्ह्यातून पाचशेपेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

स्पर्धेनंतर झालेल्या पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी प्रमुख पाहुणे माजी महापौर अभिषेक कळमकर, राष्ट्रवादीचे माजी शहर जिल्हाध्यक्ष प्रा. माणिक विधाते, माजी नगरसेविका दिपाली बारस्कर, माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, अनिल गावडे, डॉ. शजाउद्दीन सय्यद, प्राचार्या स्टीफन डिसोजा, असोसिएशनचे अध्यक्षा हेमलता काळाणे, सुनिल काळाणे, सुरेश बनसोडे, सागर गुंजाळ, अंकुश मोहिते, वैभव ढाकणे, बाली बांगरे आदींसह विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते.

पाहुण्यांचे स्वागत सुनिल काळाणे यांनी केले. प्रास्ताविकात हेमलता काळाणे यांनी कुशाग्र बुध्दीमत्तेसाठी दोन्ही मेंदू कार्यरत असणे आवश्यक असते. अबॅकसने बौद्धिक विकासाला चालना मिळून दोन्ही मेंदू कार्यरत होतात. यामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते. स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांसाठी अबॅकस व वैदिक मॅथ्स उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

अभिषेक कळमकर म्हणाले की, स्पर्धेत टिकण्यासाठी गुणवत्ता आवश्यक आहे. तर गुणवत्तेसाठी अबॅकस आवश्यक झाले आहे. अबॅकसने बौद्धिक क्षमता वाढते व मेंदूला चालना मिळते. एआयने शिक्षण क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहे, बदलत्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून शिक्षण क्षेत्रात पुढे जावे लागणार आहे. पालकांनी मुलांना वेळ देणे गरजेचे आहे. कम्युनिकेशन गॅपमुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. मुलांचे भविष्य घडविण्या अगोदर त्यांचे चांगले मित्र बनण्याचे त्यांनी आवाहन केले.

प्रा. माणिक विधाते म्हणाले की, विद्यार्थ्यांची बौध्दिक क्षमता वाढविण्यासाठी अबॅकस उपयुक्त ठरत आहे. शिक्षण व संस्कारातून सशक्त पिढी घडणार आहे. समाजाचा पाया भक्कम करण्यासाठी सुसंस्कारी पिढी निर्माण करण्याचे काम शिक्षक वर्ग करत आहे. शिक्षण क्षेत्रात काम करताना विद्यार्थी घडविल्याचा प्रत्येक शिक्षकाला अभिमान असतो. घडलेले विद्यार्थी हेच शिक्षकांचे भूषण ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

दिपाली बारस्कर म्हणाल्या की, युनिव्हर्सल अबॅकसच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यात अबॅकसची चळवळ रुजली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देखील अबॅकसचे शिक्षण सहजपणे मिळत आहे. चांगल्या शिक्षकांच्या हातात मुले दिल्यास ते उत्तमपणे घडतात. युनिव्हर्सलमध्ये शिक्षकांची चांगली टीम तयार करून विद्यार्थी घडविण्याचे कार्य सुरु आहे. विद्या हे सर्वश्रेष्ठ दान असून, त्याने संपूर्ण आयुष्यभराचे कल्याण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. सागर बोरुडे यांनी अबॅकसने विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते. अबॅकस फक्त गणित प्रक्रियेपुरता मर्यादीत नसून, त्याचा परिणाम संपूर्ण बौध्दिक क्षमतेवर होत असल्याचे स्पष्ट केले.

स्पर्धेत आयुषी राठोड (ज्युनिअर लेवल), आयांश गोयल (मास्टर ज्युनिअर), गौरी खेतमाळीस (लेवल १), आर्या जायभाय (लेवल २), अबोली पाचपुते, कियान खत्री (लेवल ३) व उत्कर्ष वाघुले (खुला गट) यांनी चॅम्पियन्स ट्रॉफी पटकाविली. सर्व गटातील पहिल्या पाच क्रमांकाच्या विजेत्यांना आकर्षक ट्रॉफीसह बक्षीसे देण्यात आले. तर सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांसह त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा देखील सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन ऋग्वेदी काकडे यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी युनिव्हर्सल अबॅकस असोसिएशनचे सर्व सदस्य, तसेच विशाल आढाव, बाबासाहेब दहातोंडे, रमेश रनसिंग, रोहित आदलिंगे व राजेश गांगर्डे यांनी परिश्रम घेतले.

# नगरमध्ये १५ ऑगस्टपासून ११ दिवसीय गरबा कार्यशाळा

## सतरंग दांडिया आणि व्हिक्टर डान्स ॲकॅडमीचे आयोजन



नगर – सतरंग दांडिया आणि व्हिक्टर डान्स ॲकॅडमी यांनी गरबा कार्यशाळेचे आयोजन केले आहे. १५ ते २६ ऑगस्ट या कालावधीत सावेडी बसस्थानकामागील कराळे क्लब हाऊस येथे प्रशिक्षण वर्ग होणार आहे. पहिल्या दिवशी १५ ऑगस्ट रोजी मोफत डेमो देण्यात येईल, अशी माहिती छाया खर्डे, राजेश चंगेडिया यांनी दिली.

स्वाती चंगेडिया, रवी राठोड, स्वप्नाली बोरा यांनी सांगितले की, गरब्याची शास्त्रशुद्ध तयारी केल्यास नवरात्रात खेळण्याचा आनंद द्विगुणित होईल या उद्देशाने सर्वांना कार्यशाळेत प्रशिक्षण दिले जाईल. अकरा दिवस दररोज सकाळी ११ ते १२, दुपारी १ ते २, सायंकाळी ५ ते ६ आणि ७ ते ८ या चार बॅच असतील.

अनुभवी प्रशिक्षक कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत. बेसिक ते ॲडव्हान्स गरबा शिकवला जाणार आहे. या कार्यशाळेतसाठी नाव नोंदणी सुरू झाली आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क: ७०३८८८४११३, ९६०४५६६५१४, ९५४५७५५२०७, ९८२२०६९४२०.



आगरकर मळा येथे भावना बोरा यांची भक्तीसंध्या उत्साहात झाला.

# आगरकर मळा येथे भावना बोरा यांची भक्तीसंध्या उत्साहात

## मुलामुलींनी नाटिका विविध वेशभूषा परिधान करून जन्म दिनानिमित्त अनुप्रेक्षाजी साध्वीजींना दिल्या अभिनव शुभेच्छा



नगर – आगरकर मळा जैन स्थानकात विदर्भ सिंहनी प्रभाकँवरजी म.सा यांच्या शिष्या जिनशासन प्रभाविका अनुप्रेक्षाजी म.सा आदि ठाणा–३ यांचा चातुर्मास उत्साही वातावरणात सुरू आहे. मंगळवारी अनुप्रेक्षाजी म.सा. यांचा ५३ वा जन्मदिन कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. भारताच्या विविध भागांतील पारंपरिक वेशभूषा परिधान करून तसेच नाटिका साकारून मुलामुलींनी शुभेच्छा दिल्या. तसेच सायंकाळी भावना बोरा (कासवा) यांची सुमधुर भक्तीसंध्या झाली. श्रूतीप्रभाजी म.सा., ऋजूप्रभाजी म.सा. यांच्या सान्निध्यात हा कार्यक्रम झाला.

विविध देवदेवतांच्या तसेच पंजाब, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, मध्यप्रदेश अशा देशातील विविध प्रांतातील पारंपरिक वेशभूषा परिधान करून मुलामुलींनी नाटिकाद्वारे विविध भाषांमध्ये साध्वीजींना शुभेच्छा दिल्या. भावना बोरा यांनी बाला आदिनाथ, सनेडो सनेडो, भक्ती की है रात, जिओ और जिने दो ज्ञान, ओ महावीर प्यारे, जब कोई नहीं आता मेरे दादा, मेरे सिरपर रखदो हात, म्हारा गुरूनीमारो आज जन्मदिन, म्हारा तिर्थंकर भगवान खम्मा खम्मा असे भक्तीगीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. बोरा यांचे चिरंजीव विहान बोरा यानेही जय जिनेंद्र गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमास महावीर श्रावक संघ, आगरकर मळा अध्यक्ष अभय कोठारी, सचिव गादिया सर, ऋषभ गांधी, सर्व कार्यकरणीने सदस्य तसेच श्रावक श्राविका उपस्थित होते.

# ‘अन्नसुरक्षा जनजागृती’ स्पर्धेत भिंगार येथील अ.ए.सो.च्या नवीन मराठी शाळेने पटकावला द्वितीय क्रमांक




‘अन्नसुरक्षा जनजागृती’ स्पर्धेत नवीन मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

नगर – हायजिन फर्स्ट संस्थेमार्फत जागर अन्नसुरक्षेचा या अभियानाला अधिक व्यापक स्वरूप देण्याच्या उद्देशाने अन्नसुरक्षा जनजागृती आंतरशालेय नाट्य स्पर्धा घेण्यात आली. अ.ए.सो. ची नवीन मराठी शाळा भिंगार या शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांनी आरोग्य धनसंपदा गट २ ह्या बाल नाटकाला द्वितीय क्रमकाचे पारितोषिक प्राप्त झाले. शालेय स्वच्छता परिसर स्वच्छता याकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्यात आले. स्वच्छते संबंधी मोलाचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. तसेच स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली. योग्य आहारा संबंधित मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या प्रमुख कार्यवाहक श्रीमती छायाताई फिरोदिया सहकार्यवाह गौरव फिरोदिया तसेच शाळा समितीचे चेअरमन रवींद्र बाकलीवाल व इतर शाळा समिती सदस्यांनी नाटकातील सहभागी विद्यार्थ्यांचे व या नाट्य स्पर्धेसाठी मार्गदर्शक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. गांगर्डे विद्या यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

या स्पर्धेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. गांगर्डे विद्या, उपशिक्षिका सौ. भांगरे विद्या, कु. पालवे सुवर्णा, श्रीमती भगवाने तृप्ती, खेले श्यामकुमार यांनी मार्गदर्शन केले.

# शिव्यांमध्ये दिल्लीकर आघाडीवर




शिव्या हा कोणत्याही भाषेचा अविभाज्य भाग असतो, असे भाषाविषयक तज्ज्ञ म्हणतात. अर्थात शिव्या देणे वाईटच आहे. मात्र शिव्यांच्या व्युत्पत्तीपासून त्या कशा बदलत गेल्या, यासंदर्भातील अभ्यास अनेक भाषा तज्ज्ञांनी यापूर्वी केला आहे. मन मोकळे करण्यासाठी, राग व्यक्त करण्यासाठी तोंडून अपशब्द निघतो, असे शिव्या देणारे सहज मान्य करतात. शिव्या देणाऱ्या राज्यांच्या यादीमध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे.

भारतातील कोणत्या राज्यात सर्वाधिक शिव्या दिल्या जातात, या प्रश्नाचे उत्तर दिल्ली असे आहे. दिल्लीतील लोक सर्वात जास्त अपशब्द वापरतात, असे एका सर्वेक्षण अहवालात असे दिसून आले आहे. आया-बहिणींवरुन शिव्या आणि मुलींना लक्ष्य करणारे अपशब्द राजधानीत सर्वात सामान्यपणे वापरले जातात. सर्वेक्षणानुसार दिल्लीतील ८० टक्के लोक त्यांच्या दैनंदिन जीवनात अपशब्द वापरतात. 'सेल्फी विथ डॉटर फाउंडेशन'चे संस्थापक आणि महर्षी दयानंद विद्यापीठातील प्रॅक्टिसचे प्राध्यापक डॉ. सुनील जगलान यांनी 'गाली बंद घर अभियान' सुरू केले आणि या उपक्रमाचा एक भाग म्हणून वेगवेगळ्या राज्यांमध्ये दीर्घकालीन सर्वेक्षण करण्यात आले. ११ वर्षांच्या कालावधीत करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात ७० हजार लोकांकडून प्रतिसाद नोंदवण्यात आला. या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या लोकांमध्ये वेगवेगळ्या समाजिक स्तरांतील प्रतिनिधी होते. तरुण, पालक, शिक्षक, डॉक्टर, ऑटो चालक, शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, पोलिस, वकील, व्यापारी, स्वच्छता कर्मचारी, प्राध्यापक आणि पंचायत सदस्य यांचा समावेश होता.

सर्वाधिक शिव्या देणाऱ्या राज्यांमध्ये पंजाब दुसऱ्या क्रमांकावर आहे. पंजाबमधील ७८ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरल्याचे मान्य केले आहे. उत्तर प्रदेश (यूपी) आणि बिहार प्रत्येकी ७४ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरतो असे म्हटले. राजस्थानमधील ६८ टक्के आणि हरियाणा ६२ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरत असल्याचे मान्य केले. महाराष्ट्रातील ५८ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरतो असे म्हटले आहे. या यादीत महाराष्ट्र सातव्या स्थानावर आहे. त्याखालोखाल गुजरातमधील ५५ टक्के लोकांनी अपशब्द वापरतो असे मान्य केले आहे. मध्य प्रदेशमधील ४८ टक्के आणि उत्तराखंड ४५ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरत असल्याचे मान्य केले आहे.

सर्वात कमी शिव्या देणाऱ्या राज्यांच्या यादीमध्ये जम्मू आणि काश्मीर सर्वात खालच्या क्रमांकावर आहे. येथील फक्त १५ टक्के लोकांनी अपशब्द वापरल्याचे सांगितले आहे.

# कॅलिडोस्कोप



## इंग्रज बनला 'शाही तुकडा' फॅन!

भारतीय जेवणाची आवड परदेशी लोकांसाठी नवीन नाही. येथील चव गोऱ्या लोकांच्या जिभेवरही रेंगाळते. पण पहिल्यांदाच शाही तुकडा खाण्यासाठी एक परदेशी व्यक्ती सुरुवातीला संकोच करत होती. त्याला त्याची चव कशी असेल हे माहीत नव्हते. पण त्याने तो खाल्ला तेव्हा त्याने आनंदाने उड्यचा मारल्या. दिल्लीच्या बाजारात फिरत असताना त्याची नजर एका मोठ्या थाळीत सजवलेल्या शाही तुकड्यावर पडली. त्याने प्रथम दुकानदाराकडून त्याचे नाव आणि दर निश्चित केला. दुकानदाराकडून शाही तुकडा घेऊन तो रेस्टॉरंटमध्ये गेला. रील करण्यासाठी कॅमेरा सुरू करून तो म्हणतो, माझ्याशिवाय या छोट्या रेस्टॉरंटमध्ये कोणीच नाही. शाही तुकड्याचा वास घेतल्यानंतर तो एक विचित्र प्रतिक्रिया देतो. त्याचा छोटा तुकडा घेतो आणि त्याची चव चांगली नसेल असे समजून जिभेवर ठेवतो. प्रत्यक्षात जिभेवर तो तुकडा ठेवल्यानंतर त्याचा मूडच बदलला. तो आनंदाने उड्या मारायला लागला. तो म्हणाला, यापेक्षा जगात दुसरे काहीही चांगले असू शकत नाही. मी याला १० पैकी १० गुण देईन. यानंतर तो पटकन ते संपवून तिथून निघून जातो. शाही तुकडा एक गोड पदार्थ आहे. तो ब्रेड, क्रीम आणि देशी तूप वापरून बनवला जातो.



# लोखंडाशिवाय बांधलं मंदिर

हरयाणातल्या अंबाला सिटीतल्या गीतानगरीमध्ये अनोख्या जैन मंदिराची उभारणी सुरू आहे. जैन मुनी विजय इंद्रदिन्न सुरिश्वर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हे मंदिर उभारलं जात आहे. या मंदिराचा आकार गोल असेल. हे मंदिर बांधण्यासाठी संगमरवराचा वापर केला जात आहे. या मंदिराच्या उभारणीत लोखंडाचा अजिबात वापर झालेला नाही. लोखंडाचा एखादा खिळाही ठोकण्यात आलेला नाही. अशा प्रकारचं हे उत्तर भारतातलं पहिलंच मंदिर आहे. २०११ मध्ये या मंदिराच्या उभारणीला सुरुवात करण्यात आली. या मंदिराचा नकाशा कोणत्याही वास्तुशास्त्रज्ञाने नाही तर खुद्द जैन मुनी विजय रत्नाकर सुरिश्वर यांनी तयार केला आहे. त्यांच्या संकल्पनेनुसार हे मंदिर बांधलं जात आहे. या मंदिराचं बांधकाम जैन स्थापत्यशैलीत केलं जात आहे. संगमरवरावरचं नक्षीकाम राजस्थानमध्ये केलं जात आहे. असं हे अनोखं जैन मंदिर अंबालाची शान ठरणार आहे.

# असा हा नेप्च्यून



आपली सूर्यमाला अनेक रहस्यांनी भरलेली आहे. पृथ्वी हा सौरमालेतला तिसरा ग्रह. या पृथ्वीवरच जीवसृष्टी बहरली, फुलली. माणसाला मंगळ ग्रहाचं प्रचंड आकर्षण आहे. मंगळावर जीवसृष्टीचं अस्तित्व आहे का, याचा शोध सुरू आहे. आपल्या सौरमालेतल्या चार ग्रहांवर दगड, माती नाही तर वायू आहेत. म्हणूनच हे ग्रह खूप धोकादायक मानले जातात. नेपच्युन, गुरू, शनी आणि युरेनस असे हे चार ग्रह आहेत. नेपच्यून हा ग्रह पृथ्वीपासून खूप लांब आहे. तसंच तो धोकादायकही आहे. या ग्रहावरचं तापमान उणे २०० इतकं असतं. म्हणजे या ग्रहावर जाण्याचा विचारही आपण करू शकणार नाही. २३ सप्टेंबर १८४६ रोजी या दिवशी नेपच्यूनला पहिल्यांदाच दुर्बिणीतून पाहिलं गेलं. या ग्रहाला नेपच्यून हे नाव देण्यात आलं. या ग्रहाच्या अस्तित्वाच्या शक्यता त्याच्या शोध लागण्याआधीच व्यक्त करण्यात आल्या होत्या.

नेपच्यून हे रोमन देवतेचं नाव आहे. नेपच्यूनवर मिथेन वायूपासून तयार झालेले ढग आहेत. इथे हवा खूप वेगाने वाहते. इथले वारे १५०० मैल प्रति तास एवढ्या वेगाने वाहतात. नेपच्यूच्या वातावरणात कार्बनचं प्रमाण बरंच जास्त असल्यामुळे इथे हिऱ्यांचा पाऊस पडतो. असा हा नेपच्यून सर्वार्थाने अनोखा आहे.




# सर, मी विकला गेलोय!


मध्यंतरी एक मजेदार राजीनाम्याचा ईमेल 'सोशल मीडिया'त प्रचंड व्हायरल झाला होता. या ईमेलमध्ये त्या व्यक्तीने इतक्या प्रामाणिकपणे आणि मोकळेपणाने आपली गोष्ट लिहिली आहे की ती वाचून कोणीही आपले हसू आवरू शकत नाही. मुंबईतील 'हिंग्लिश' या ब्रँडचे संस्थापक आणि 'सीईओ' शुभम गुणे यांनी 'लिंक्डइन'वर मजेदार राजीनामापत्र शेअर केले होते. अल्पावधीतच ते व्हायरल झाले. 'ईमानदार इस्तीफा' या कॅप्शनसह ते शेअर करण्यात आले आहे.

या ईमेलमध्ये 'नमस्ते सर, मी विकला गेलोय. समोरची कंपनी मला चार पैसे जास्त देतेय', असे लिहिले आहे. कमेंट सेक्शनमध्ये या ईमेलला भरघोस प्रतिसाद मिळाला असून अनेकांनी याला प्रत्येक कर्मचाऱ्याच्या मनातील भावनांचा आवाज म्हटलंय. एका यूजरने मजेशीरपणे म्हटले, 'तुमच्या ईमेलमधील स्पष्टतेचा हा खरा अर्थ आहे. आम्ही नेहमीच याला चुकीच्या पद्धतीने समजत आलो आहोत. दुसऱ्या एका यूजरने लिहिले, 'हा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या अंतरात्म्याचा आवाज आहे.' ही मजेदार पोस्ट आणि त्यावरील प्रतिक्रिया यामुळे 'सोशल मीडिया'वर या राजीनामा पत्राची जोरदार चर्चा झाली.

अनेकांनी या ईमेलच्या साधेपणाला आणि प्रामाणिकपणाला दाद दिली आहे. या ईमेलने कर्मचाऱ्यांच्या मनातील खऱ्या भावना हलक्या-फुलक्या पद्धतीने मांडल्या असून इंटरनेटवर क्रिएटिव्हिटी आणि विनोद याची कमतरता नसल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले.

# विवाहबाह्य संबंधात कांचीपूरम्‌ची आघाडी

भारतात विवाहबाह्य संबंध आता केवळ महानगरांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. आता टियर-२ आणि टियर-३ शहरांमधील लोकदेखील नात्यांसाठी 'पर्याय' शोधत आहेत. जगातील सर्वात लोकप्रिय अतिरिक्त विवाहबाह्य डेटिंग प्लॅटफॉर्म 'अॅशले मॅडिसन' च्या जून २०२५ च्या आकडेवारीने याची पुष्टी केली आहे. या अहवालानुसार, तामिळनाडूतील कांचीपूरम्‌ हे छोटे शहर या वेळी भारतातील सर्वाधिक 'अॅशले मॅडिसन' वापरणारे शहर बनले आहे.



गेल्या वर्षी हे शहर १७ व्या स्थानावर होते आणि आता अचानक ते दिल्ली आणि मुंबईसारख्या मेट्रो शहरांना मागे टाकत पहिल्या क्रमांकावर आले आहे. कांचीपूरम्‌ हे भारतातील विवाहबाह्य संबंधाचे हब बनले आहे. रेशमी साड्या आणि मंदिरांसाठी ओळखले जाणारे कांचीपूरम्‌ आता 'अॅशले मॅडिसन'च्या आकडेवारीनुसार वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. या शहराची लोकसंख्या फक्त २ लाख आहे. परंतु येथील विवाहबाह्य डेटिंगच्या अनेक घटनांनी मोठ्या महानगरांना मागे टाकले आहे. या वर्षीच्या टॉप २० यादीत मुंबईचे नाव कुठेही नाही. तर दिल्ली-एनसीआरमधील ९ भागांचा या यादीत समावेश आहे. यामध्ये मध्य दिल्ली, दक्षिण पश्चिम दिल्ली, पूर्व दिल्ली, दक्षिण दिल्ली, पश्चिम दिल्ली, उत्तर पश्चिम दिल्ली, गुडगाव, गाझियाबाद आणि नोएडा (गौतम बुद्ध नगर) सारखी शहरे समाविष्ट आहेत.


या यादीत जयपूर, रायगड, कामरूप आणि चंदीगडसारखी इतर अनेक लहान शहरेदेखील समाविष्ट आहेत. एप्रिल २०२५ मध्ये 'अॅशले मॅडिसन'ने 'यूगव्ह'द्वारे एक सर्वेक्षण प्रसिद्ध केले. त्यात असे दिसून आले, की भारत आणि ब्राझीलमध्ये विवाहबाह्य संबंधांचे प्रमाण सर्वाधिक आहे. या सर्वेक्षणात आपले कधी ना कधी विवाहबाह्य संबंध होते, असे ५३ टक्के भारतीयांनी कबूल केले. या अहवालातून भारतात पारंपारिक संबंधांची व्याख्या बदलत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अगदी आत्तापर्यंत समाजात लग्न आणि वचनबद्धतेबद्दल कठोर मूल्ये होती, तर आता लोक उघडपणे त्यांचे पर्याय शोधत आहेत. 'अॅशले मॅडिसन'सारखे प्लॅटफॉर्म अशा लोकांसाठी 'गुप्त मार्ग' बनत आहेत.



# मंत्री पत्नीलाच विसरले!

एका अत्यंत विचित्र घटनेमुळे केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान मध्यंतरी इंटरनेटवर चर्चेचा विषय ठरले होते. केंद्रीय कृषिमंत्री एक दिवसाच्या गुजरातच्या धार्मिक दौऱ्यावर होते. या भेटीदरम्यान त्यांनी जुनागडमधील सोमनाथ ज्योतिर्लिंग मंदिर आणि गीर राष्ट्रीय उद्यानाला भेट दिली. नंतर ते 'पीनट रिसर्च सेंटर'च्या शेतकऱ्यांशी आणि 'लखपती दीदी' योजनेअंतर्गत येणाऱ्या लाभार्थींशी संवाद साधणार होते. त्यांना रात्री आठ वाजता राजकोटहून विमानाने प्रवास करायचा होता. त्यामुळे ते कार्यक्रम, भेटीगाठी लवकर संपवण्याच्या घाईत होते. संशोधन केंद्राच्या भेटीदरम्यान, त्यांनी कर्मचाऱ्यांसोबत कामाचा आढावा घेतला तर त्यांच्या पत्नी, साधना प्रतीक्षागृहात बसल्या होत्या. त्यानंतर शिवराज यांनी 'लखपती दीदी' योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला.

कार्यक्रमाच्या व्यासपीठावर ते वारंवार त्यांच्या घड्याळाकडे पाहत होते. आपल्या भाषणामध्येही शिवराज सिंह चौहान यांनी, राजकोटचा रस्ता खराब आहे, पुढच्या वेळी मी आरामात येईन, असे विधान करत आपल्याला घाई असल्याचे सूचित केले. त्यांनी आपले भाषण आटोपते घेतले. त्यानंतर शिवराज सिंह चौहान ताफ्यासह जुनागढहून राजकोटच्या दिशेने घाईघाईत निघाले. दुसरीकडे साधना गिरनारला भेट देऊन परत आल्या होत्या आणि प्रतीक्षागृहात शिवराज सिंह चौहान यांची वाट पाहत बसल्या होत्या. सुमारे १० मिनिटे प्रवास केल्यानंतर साधना त्यांच्यासोबत अथवा ताफ्यातील एकाही कारमध्ये नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. मग त्यांनी ताबडतोब पत्नीला फोन केला आणि ते ताफ्यासह परतले. पत्नीला घेऊन ते राजकोटला रवाना झाले.



# खाऱ्या पाण्याचं सरोवर



मध्य आशियातल्या देशांमध्ये असणाऱ्या पामीर पठाराला जगाचं छप्पर म्हटलं जातं. हे पठार आणि पर्वतरांगांच्या मध्ये एक सरोवर आहे. हे सरोवर समुद्रसपाटीपासून सुमारे चार हजार मीटर उंचीवर आहे. काराकुल सरोवर असं त्याचं नाव. हे सरोवर दक्षिण अमेरिकेतल्या टिटिकाका सरोवरापेक्षाही अधिक उंचीवर आहे. ते सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीचं असल्याचं बोललं जातं. पृथ्वीवर उल्कापिंड पडल्यामुळे तयार झालेल्या खड्ड्यामुळे या सरोवराची निर्मिती झाली आहे. हे सरोवर ३८० चौरस मीटर परिसरात पसरलं आहे. ते खूप खोलही आहे. हे स्थान चारही बाजूंनी बर्फाच्छादित पर्वतरांगांनी घेरलं आहे. या सरोवरातल्या पाण्याचा रंग दिवसभरात बरेचदा बदलतो. रात्रीच्या वेळी या सरोवरातल्या पाण्याचा रंग काळाकुट्ट दिसतो. म्हणूनच या सरोवराचं नाव काराकुल असं ठेवण्यात आलं आहे. काराकुल म्हणजे काळा. काराकुल हे आशिया खंडातलं सर्वात खाऱ्या पाण्याचं सरोवर आहे. यात फक्त एका प्रजातीचा मासा राहतो. त्याशिवाय दुसरा कोणताही जीव या खाऱ्या पाण्याच्या सरोवरात टिकून राहू शकत नाही.

# पृथ्वीवरचा चंद्र

२० जुलै १९६९ या दिवशी अमेरिकेचे अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर पाऊल ठेवलं. हे चंद्रावर पडलेलं मानवाचं पहिलं पाऊल होतं. आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर अमेरिकेचा झेंडा रोवला. आपलं हे छोटंसं पाऊल अखिल मानवजातीसाठी मोठी उडी ठरेल, असं त्यांनी नमूद केलं होतं. मानवाची चंद्रावरही ही स्वारी ऐतिहासिक ठरली. हे अमेरिकेचं मोठं यश होतं. मात्र या यशात आईसलँडचाही वाटा होता. 'अपोलो ११' या मोहिमेआधी अंतराळवीरांना चंद्रासारखं वातावरण असणाऱ्या पृथ्वीवरच्या एका ठिकाणी पाठवण्यात आलं होतं. हे ठिकाण आईसलँडमध्ये आहे. आईसलँडच्या उत्तर किनाऱ्यावर असणाऱ्या हुसाविक या ठिकाणी अंतराळवीरांना प्रशिक्षण देण्यात आलं. हुसाविक हे २३०० मच्छिमारांचं छोटंसं शहर होतं. नासाने १९६३ ते १९६७ या काळात ३२ अंतराळवीरांना या ठिकाणी प्रशिक्षणासाठी पाठवलं होतं. आजवर १२ लोकांनी चंद्रावर पाऊल ठेवलं आहे. अंतराळ मोहिमेआधी यापैकी नऊ लोक हुसाविक या ठिकाणी आले होते. यात नील आर्मस्ट्राँगचाही समावेश होता. म्हणूनच हुसाविक या ठिकाणाचं मोठं महत्त्व आहे.

# अतिक्रमण करणाऱ्याने ग्रामपंचायत सदस्यावर केला खुनी हल्ला

## सरपंच, उपसरपंचालाही शिवीगाळ करत दमबाजी, एकावर गुन्हा दाखल

नगर – ग्रामपंचायत मार्फत शासनाच्या आदेशा नुसार गावच्या शिवारातील सरकारी जमिनीवर मियावाकी फॉरेस्ट पद्धतीने वृक्ष लागवड करण्यासाठी जेसीबीच्या सहाय्याने साफसफाई करत असताना त्या परिसरात शासकीय जागेवर अतिक्रमण करून राहणाऱ्या व्यक्तीने सरपंच, उपसरपंच यांना शिवीगाळ करत माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्यावर लोखंडी रॉड आणि दगडाने हल्ला करत त्याचा गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना नगर तालुक्यातील घोसपुरी येथे घडली.



अतिक्रमण करणाऱ्याने केलेल्या खुनी हल्लयात जखमी झालेले ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल हंडोरे यांच्यावर उपचार करताना डॉक्टर.

या हल्लयात ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल चंद्रभान हंडोरे (वय ३७, रा. घोसपुरी, ता.नगर) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर नगरमधील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या प्रकरणी आरोपी स्वामी सर्जेराव चव्हाण (रा. घोसपुरी, ता.नगर) याच्या विरुद्ध नगर तालुका पोलिस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घोसपुरी गावात सरपंच किरण साळवे, उपसरपंच संतोष खोबरे, माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल हंडोरे, ग्रामपंचायत कर्मचारी सुधीर झरेकर हे २ ऑगस्ट रोजी दुपारी मियावाकी वृक्ष लागवड करण्यासाठी गावच्या शिवारातील सरकारी जमिनीची जेसीबीच्या सहाय्याने साफसफाई करत असताना त्या परिसरात शासकीय जागेवर अतिक्रमण करून राहणाऱ्या स्वामी सर्जेराव चव्हाण या व्यक्तीने सरपंच व उपसरपंच यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

त्यावेळी हंडोरे त्यास समजावून सांगत असताना त्याने अचानक हंडोरे यांच्यावर लोखंडी पाईप व दगडाने जीवघेणा हल्ला केला. यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. तसेच ते खाली पडल्यावर आरोपी त्यांच्या छातीवर बसला आणि त्यांचा गळा दाबून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तेथे उपस्थित इतरांनी हंडोरे यांना त्याच्या तावडीतून सोडवत त्यांना उपचारासाठी प्रथम जिल्हा शासकीय रुग्णालयात व नंतर खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. ३ दिवस अतिदक्षता विभागात उपचार घेतल्यानंतर ५ ऑगस्ट रोजी त्यांनी नगर तालुका पोलिसांना दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी हा गुन्हा दाखल केला आहे.

### गतवर्षी सरपंचावरही झाला होता कोयत्याने हल्ला

गतवर्षी २० जुलै २०२४ रोजीही गावातील एका अतिक्रमण धारकाने सरपंच किरण साळवे यांच्यावर कोयत्याने हल्ला करत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. गावातील रस्त्याचे मुरुमीकरण सुरु असताना माझ्या घरासमोर मुरुम का टाकला असे म्हणत अय्याज शौकत शेख याने हा हल्ला केला होता. या प्रकरणी त्याच्यावर जीवे मारण्याचा प्रयत्न, आर्म ॲक्ट सह ॲट्रॉसीटीचा गुन्हा नगर तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेला आहे. पुन्हा एका अतिक्रमण धारकाने ग्रामपंचायत सदस्यावर जीवघेणा हल्ला केल्याने ग्रामस्थ संतप्त झालेले असून सुमारे १०० पेक्षा जास्त ग्रामस्थांनी पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना ५ ऑगस्ट रोजीच निवेदन देवून आरोपीवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केलेली आहे. तसेच या घटनेच्या निषेधार्थ ८ ऑगस्ट रोजी गावात विशेष ग्रामसभाही आयोजित करण्यात आली आहे.

# स्वखर्चाने कचरा संकलनाला सुरुवात

## महानगरपालिकेच्या निष्क्रियतेवर भारतीय जनता पार्टीचे सुजय मोहिते यांचा पुढाकार

नगर – केडगाव मधील प्रभाग क्रमांक १६ मध्ये गेल्या दहा दिवसांपासून महानगरपालिकेच्या घंटागाड्या न फिरल्याने रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचून अस्वच्छता व दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले होते. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनाने व होत असलेल्या गैरसोयीची तात्काळ दखल घेत भाजपचे सुजय अनिल मोहिते यांनी स्वतःच्या खर्चाने कचरा संकलन मोहिमेला सुरुवात केली आहे.



भाजपचे सुजय मोहिते यांच्या पुढाकाराने भाजपचे सुजय अनिल मोहिते यांनी स्वतःच्या खर्चाने कचरा संकलन मोहिमेला सुरुवात केली आहे.

सुजय मोहिते म्हणाले की, नागरिकांशी रोजचा संपर्क असल्याने ते प्रश्न घेऊन येत असतात. परिसरात स्वच्छतेचा प्रश्न गंभीर झाल्याने नागरिकांच्या तक्रारी येत होत्या. प्रभागातील कचरा व अस्वच्छतेचा प्रश्न गंभीर होत असल्याने, अखेर स्वखर्चाने का होईना हा प्रश्न सोडवण्याचा निर्णय घेऊन कचरा संकलन मोहिमेची सुरुवात करण्यात आली. नागरिकांचे देखील सहकार्य मिळत असल्याने लवकरच हा प्रश्न पूर्णपणे सुटणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सुजय मोहिते यांनी स्वखर्चाने सुरु केलेल्या कचरा संकलन मोहिमेद्वारे ट्रॅक्टर, जेसीबी आणि डंपरच्या सहाय्याने प्रभागातील कचरा उचलण्याचे काम सुरू आहे.



नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग.ज.चितांबर विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींनी विद्यालयास शैक्षणिक साहित्य भेट दिले.

# चितांबर विद्यालयास सुमारे ४५ हजारांचे वाचन साहित्य भेट

नगर – नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींनी विद्यालयास तब्बल ४५ हजार रुपये खर्चून तीन पुस्तक प्रदर्शित करण्याच्या रॅक्स, दोन वृत्तपत्र स्टॅन्ड, विविध विषयांवरील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त अशी दोनशे पुस्तके, खेळण्यासाठी दोऱ्या, बुद्धिबळ तसेच वाचनालय मांडणी व सजावटीसाठी तब्बल ११ हजार रुपये रोख अशी भेट मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांच्याकडे सुपूर्द केली.

विविध क्षेत्रांमध्ये देश–विदेशात यशस्वीपणे कामगिरी करणाऱ्या विद्यालयाच्या २००८ सालच्या दहावी अ आणि ब वर्गातल्या गुणवंत अशा तब्बल तेहतीस विद्यार्थ्यांनींनी विद्यालयातील आपल्या भावंडांसाठी आणि त्यांच्या सर्वोत्तम प्रगतीसाठी कृतज्ञता म्हणून हि साहित्य भेट दिली.

शाळेतील संस्कार आणि बालवयात लागलेली वाचनाची सवय यामुळेच आम्ही यशस्वी झालो, असे प्रतिपादन या बॅचची प्रतिनिधी गायत्री झंवर हिने भेट हस्तांतरण प्रसंगी केले. यापुढील विद्यार्थ्यांवर देखील हे वाचनसंस्कार कायम राहावेत अशीच या भेटीमागील भावना असल्याचे तिने सांगितले.

यावेळी या बॅचमधील अनेक विद्यार्थिनींनी विद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांशी गुगल मीट द्वारे संवाद साधला.

# डोंगर दऱ्यातील वनभाज्यांचा आस्वादासाठी चोखंदळ नगरकरांची झुंबड

## जनजाती कल्याण आश्रमाच्या वनभाजी महोत्सवास उदंड प्रतिसाद

नगर – अहिल्यानगरच्या जनजाती कल्याण आश्रम आयोजित वनभाजी महोत्सवात अकोले व रतनगड भागात डोंगर दऱ्यांमध्ये नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या खुरासणी, पाथरी, चिलाची भाजी, करटुले भाजी, सराटा भाजी, तेरा भाजी व तांदुळजा अशा विविध रानभाज्या उपलब्ध करून देण्यात आल्या. तांदळाच्या व नाचणीच्या भाकरी बरोबर या रानभाज्यांचा आस्वाद घेत नगरकर सुखावले.



जनजाती कल्याण आश्रम आयोजित वनभाजी महोत्सवाचे उद्घाटन करताना रा.स्व.संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव. यावेळी अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष अरविंद पारगांवकर, सचिव अनंत पुंड, प्रांत सहसचिव महेंद्र जाखेटे, डॉ.निळकंठ ठाकरे व पदाधिकारी.

महोत्सवचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी शाखेचे अध्यक्ष अरविंद पारगांवकर, सचिव अनंत पुंड, प्रांत सहसचिव महेंद्र जाखेटे यांच्यासह पदाधिकारी व विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी नानासाहेब जाधव म्हणाले, वनवासी समाजाच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांच्यात व शहरी समाजात फुट पाडून दरी निर्माण केली गेली. त्यामुळे वनवासी समाज प्रगती पासून दुरावला. पण जनजाती कल्याण आश्रमाच्या माध्यमातून 'तू मै एक रक्त' या ब्रीदाने ही दरी कमी करून त्यांना प्रवाहात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत आहे. वनभाजी महोत्सव हा वनवासी व शहरी नागरिक यांच्यात दुवा साधणारा व नातं घट्ट करणारा उपक्रम आहे.

अरविंद पारगावकर म्हणाले, वनभाजी महोत्सव ही नवी संकल्पना घेऊन नैसर्गिक न्युट्रीशन व व्हिटॅमिन युक्त रोगप्रतिकारक वनभाज्या नगरकरांसाठी प्रथमच उपलब्ध केल्या. या पहिल्याच उपक्रमाला नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. अकोले रतनगड भागात प्रचंड पाऊस सुरु असल्याने बऱ्याच रानभाज्या उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. संस्थेचे सर्व पदाधिकाऱ्यांनी उत्कृष्ट नियोजन करून हा महोत्सव यशस्वी केला आहे.

प्रास्ताविकात माजी सचिव डॉ.निळकंठ ठाकरे यांनी आश्रमाच्या कार्याची व उपक्रमांची माहिती दिली. रतनवाडी येथील सहभागी महिला श्रीमती वनिता झडे यांनी रानभाज्यांची माहिती व उपयोग सांगितले. प्रा.जयंत क्षीरसागर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

महोत्सवाला पहिल्याच दिवशी मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे हा महोत्सव दोन दिवसा ऐवजी एक दिवसाचाच करावा लागला, असे महेंद्र जाखेटे यांनी सांगितले.

यावेळी मिलिंद मुळे, उमेश खिंदारे, प्रशांत आढाव, अनिल लवांडे, राजेंद्र डांगे, हरिश्चंद्र थिगळे, विशारद पेटकर यासह महिला कार्य प्रमुख डॉ.मैत्रेयी लिमये आणि श्रीमती विद्या पटवर्धन व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सुरांच्या माध्यमातून शब्दांना सौंदर्य देणारा गायक मोहंमद रफी

## सईद खान यांचे प्रतिपादन; एक शाम रफी के नाम मैफिलीने अभिवादन

नगर – शब्द हे फार काही करु शकते. कवींनी लिहिलेल्या गीतांमुळे माणसाला आकाशात असल्याचे भासावून जाऊ शकते. तर त्याच शब्दांनी माणसाची निचांकी ही होते. अशाच या कवींनी लिहिलेल्या गीतांना जोपर्यंत सुरांची साथ मिळत नाही तो पर्यंत ते रसिकांना आवडत नाही. या कार्यात सुरांच्या माध्यमातून शब्दांना सौंदर्य देण्यात मोहंमद रफि यांचा हातखंडा होता, असे प्रतिपादन सईद खान यांनी केले.




सईद खान यांच्यावतीने स्व.मोहंमद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्त 'एक शाम रफी के नाम'चे रहमत सुलतान सभागृहात आयोजन करण्यात आले होते.

सईद खान यांच्यावतीने स्व.मोहंमद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्त 'एक शाम रफी के नाम'चे रहमत सुलतान सभागृहात आयोजन करण्यात आले होते.

यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रात उत्तीर्ण होणारे युवराज गांधी (सी.ए.), प्रज्ञा गांधी (सी.ए.), सानिया असलम शेख (बीसीए) या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रारंभी मोहंमद रफी यांना अभिवादन करण्यात आले.

या श्रद्धांजली कार्यक्रमात सईद खान, अन्वर शेख, आबीद हुसेन, अंजुम पटवेकर, अन्सार शेख, संजय भिंगारदिवे, मुख्तार शेख, विद्या तन्वर, योगिनी अक्कडकर यांनी मोहम्मद रफीच्या सदाबहार एकापेक्षा एक नावाजलेली गीते सादर करून उपस्थित संगीत रसिकांना मंत्रमुग्ध केले. वाह वाह... क्या खूब है... बहुत बढीया अशा दादने रसिक वर्ग प्रत्येक गायकाला प्रोत्साहित करत होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर खान यांनी केले.

# नगरमध्ये ७ ऑगस्टला 'जागेवर निवड संधी' उपक्रम

नगर – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी 'जागेवर निवड संधी' उपक्रमाचे आयोजन ७ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत प्रशासकीय इमारत, पहिला मजला, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष उपस्थित राहावे व रोजगाराच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.

या उपक्रमात मेंटर्स ट्रेनिंग ॲण्ड कन्सल्टन्सी व टाटा मॅक्स मोटर्स या दोन खाजगी आस्थापना सहभागी होणार असून, उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहे. आयटीआय, डिप्लोमा, पदवी, पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी जागेवरच नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी जर अद्याप सेवायोजनाची नोंदणी केलेली नसेल, तर त्यांनी www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावी. त्यानंतर लॉगिन करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी अर्ज सादर करावा. तसेच, उपक्रमाच्या दिवशी प्रशासकीय इमारतीत प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती द्याव्यात.

उमेदवारांनी www.ncs.gov.in या राष्ट्रीय करिअर सेवा संकेतस्थळावरही जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा व रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी समन्वयक वसीमखान पठाण यांच्याशी ९४०९५५५४६५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात ६ व ७ ऑगस्टला पाऊस

नगर – जिल्ह्यात ६ व ७ ऑगस्ट रोजी विजांच्या कडकडाटासह हलक्यांपासून मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि सोसाट्याचा वारा येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. यामुळे जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आला आहे.

पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पाऊस होण्याची शक्यता असून जिल्ह्यातून वाहणाऱ्या भीमा, प्रवरा, गोदावरी, सीना आणि हंगा या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होऊ शकते. मुळा धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील कोतुळ येथून मुळा नदीपात्रात विसर्ग सुरू असल्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

वादळी वारा, विजा आणि पावसाच्या वेळी नागरिकांनी खबरदारी घ्यावी. झाडाखाली, टॉवर्सजवळ, ध्वज वा वीजखांबाजवळ, ट्रान्सफॉर्मर किंवा धातूच्या कुंपणाजवळ थांबू नये. विजा चमकत असताना घरातच सुरक्षित राहावे. कोणतेही विद्युत उपकरण वापरू नये. ट्रॅक्टर, शेती अवजारे, सायकल, मोटारसायकलपासून दूर राहावे. लोंबकळणाऱ्या केबल्सपासून सावध रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळण्याची शक्यता असल्याने त्यांच्या आसपास थांबू नये. मोकळ्या जागेत असताना विजा चमकत असल्यास गुडघ्यांवर बसून, हातांनी कान झाकावेत आणि डोके गुडघ्यांमध्ये ठेवून जमिनीशी कमी संपर्क ठेवावा.

धरण परिसरात किंवा नदीच्या प्रवाहात उतरू नये. पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. वादळी वारे, पाऊस आणि गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान होऊ नये, यासाठी शेतकऱ्यांनी माल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीत माल विक्रीसाठी नेला असल्यास त्याचे नुकसान होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. जनावरेही सुरक्षित ठिकाणी हलवावीत व त्यांचे रक्षण होईल, यासाठी तयारी ठेवावी.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी जवळच्या तहसील कार्यालय, पोलीस ठाणे किंवा जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. जिल्हाधिकारी कार्यालयातील टोल फ्री क्रमांक १०७७ तसेच ०२४१–२३२३८४४ किंवा ०२४१–२३५६९४० या दूरध्वनी क्रमांकांवरही संपर्क करता येईल, असे प्रशासनाने कळवले आहे.

# फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

नगर – राज्यभरात तसेच नगर जिल्ह्यात सिस्पे इन्फिनिटी, बीकॉम अशा विविध नावांनी बोगस कंपन्या स्थापन करून गोरगरिब गुंतवणूकदारांची हजारो कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या कंपन्यांनी जास्त परताव्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची रक्कम गोळा केली असून, त्या रकमेचा वापर संचालक व एजंटांनी आएशो आराम जीवनासाठी केल्याचा आरोप आहे. या फसवणुकीची व्याप्ती केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर राज्याबाहेरही असल्याचे दिसून आले असून, या कंपन्यांनी हवालामार्फत फसवणुकीतील रक्कम परदेशात पाठवली आहे. गुंतवणूकदारांची व शासनाची दिशाभूल करून डॉलरमध्ये रुपांतरित केलेली ही रक्कम परत मिळण्यासाठी आणि संपूर्ण घोटाळ्याची सखोल चौकशी व्हावी, यासाठी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे प्रकरण वर्ग करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.



फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले.

श्रीगोंदा तालुका व अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक गुंतवणूकदार या फसवणुकीचे बळी ठरले असून, त्यांच्या गुंतवणुकीसह व्याज परत मिळावे, तसेच दोषींवर कायदेशीर कारवाई करून त्यांना तातडीने अटक करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा येथील राजेंद्र म्हस्के, ॲड. एस. आर. साके, अंबादास दरेकर, माऊली मोटे, महादेव म्हस्के, मोहन पवार, मुकुंद सोनटक्के, नितीन बोराडे, विनय दरेकर, प्रवीण धुमाळ, अनिकेत धुमाळ यांच्यासह फसवणूकग्रस्त गुंतवणूकदारांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले.

या प्रकरणातील कंपन्यांचे संचालक, व्यवस्थापन करणारे अधिकारी, एजंट यांच्यावर फसवणुकीचे गुन्हे दाखल करून त्वरित अटक करावी. तसेच या प्रकरणात आरोपींना पाठबळ देणाऱ्यांनाही सहआरोपी करून कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

# शरदचंद्रजी पवार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजचा शुभम मोहितें AIAPGET परीक्षेत महाराष्ट्रात दुसरा

नगर – शिवा ट्रस्ट संचालित शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल वडाळा महादेव तालुका श्रीरामपूर येथील विद्यार्थी शुभम मोहिते याने AIAPGET परीक्षेत यश मिळवले त्याने महाराष्ट्र राज्यातून दुसरा क्रमांक तसेच ऑल इंडिया ७५ क्रमांक मिळवून महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे.



शुभम हा गरीब शेतकरी कुटुंबातील असून तो हुशार विद्यार्थी आहे त्याने आपल्या अथक परिश्रमाने प्रथम वर्षात ७०.८% इतके मार्क्स मिळवून पहिला आला, द्वितीय वर्षात ६७.३३% इतके मार्क्स मिळवून पहिला आला, तृतीय वर्षांत ६५.९१% इतके मार्क्स मिळवून पहिला आला चतुर्थ वर्षात ६७.९३% इतके मार्क्स मिळवले होते. मेडिकल कॉलेजचे असोसिएट प्रोफेसर व श्रीरामपूर येथील डॉ. सुरज थोरात यांचे मार्गदर्शन व सहकार्य त्याला लाभले.

# संवर्ग एक व दोन मधील खोटे लाभधारकांबाबत सखोल चर्चा

नगर – राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष शेखर पंचमुख यांनी जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी तसेच शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांची भेट घेऊन संवर्ग एक व संवर्ग दोन मधील खोटे लाभधारकांच्या मुद्द्यावर चर्चा केली. या भेटीदरम्यान, पंचमुख यांनी संवर्ग एकमधील खोटे लाभधारक ओळखण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या शारीरिक तपासणी मोहिमेच्या सुरूवातीबद्दल सीईओ भंडारी यांचे आभार मानले. व त्यांना शाल, गुलाबपुष्प व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.



राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष शेखर पंचमुख यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचा सत्कार केला.

पंचमुख यांनी मोहिमेत काही गंभीर आजारांनी पीडित शिक्षकांना जाणीवपूर्वक वगळण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला. अर्धांगवायू, पक्षाघात, कॅन्सर, हृदयविकार अशे विविध आजार असलेल्या शिक्षकांची यादी जाणीवपूर्वक प्रसिद्ध करण्यात आली नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. यावर त्वरित प्रतिसाद देत सीईओ भंडारी यांनी शिक्षण विभागाला याबाबत निर्देश दिले. कोणालाही अभय देण्यात येणार नसल्याची खात्रीही त्यांनी दिली व लवकरच सर्व यादी प्रसिद्ध केली जाईल असे आश्वासन दिले. त्यानंतर शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांची भेट घेऊन, संवर्ग दोन मध्ये खोटे अंतर दाखवून लाभ घेतलेल्या शिक्षकांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. पाटील यांनीही यासंदर्भात पूर्ण सहकार्याचे आश्वासन देत, दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले. व मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी या विषयांवर सातत्याने लढा देणाऱ्या शेखर पंचमुख यांच्या कार्याचे कौतुक केले व भविष्यातही पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या वेळी शेखर पंचमुख यांच्यासोबत त्यांचे शिष्टमंडळही उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

